# चैतन्य लहरी

खंड ४ अंक १



"कितीतरी आत्मे इथे सर्वशक्तिमान ईश्वराचं प्रतिबिंब दाखवत बसले आहेत. आई म्हणून किती अभिमान वाटतो मला. जगांतील अनेक लोकांना आलोकित करण्याची क्षमता तम्हा सर्वांकडे आहे."

— श्री माताजी निर्मला देवी,

दिवाळी पुजा, कबेला, इटली, १० नोव्हें. १९९१

# दिवाळी पूजा

## कॅबेला दि. १० नोव्हेंबर १९९१.

## (परम पूज्य श्री माताजींच्या भाषणाचा सारांश)

फ्रान्समधे दिवाळी पूजा झाली त्यावेळी श्रीमाताजींनी आम्हाला सहज योगात आनंदी रहावे असा उपदेश केला. त्या म्हणाल्या की आपल्या व्यक्तिमत्वातून, साक्षात्काराचा आणि आपण परमेश्वरी राज्यात आहोत याचा आनंद अभिव्यक्त व्हायला व्हावा. त्यातले त्यांत, आपण दुःखी गाणी म्हणू शकत नाही अथवा शोकांतिकांची पुस्तके वाचू शकत नाही. श्री माताजी पुढे म्हणाल्या, "स्त्रीयांच्यामध्ये रडण्याची अश्रू ढाळण्याची जलशक्ति आहे. तसेच आपण महान दुःखात आहोत असे विचार करीत रहाण्याची व इतरांना दुःखी करण्याची शक्तिही त्यांना आहे. प्रत्येक स्त्रीमध्ये मातृत्व आहे. महान कार्य करण्याची क्षमता आहे. त्या बलिदानही करू शकतात. पण त्याच बरोबर त्या डावी बाजू प्रधान (लेफ्ट साईडेड) असतात. तसेच आपल्या हृदयातील आनंदाच्या विषयी आपण बोलतो तो आनंद बाहेर दिसून यायला हवा. लोकांना हे दिसायला हवे की आम्ही आनंदी लोक आहोत सुखांत आहोत. इतरांच्या सारखे लहान लहान गोष्टींवरून रडत बसणारे नव्हेत.

संकट प्रसंगीही सहज योगीनींनी रडू नये. श्रीमाताजींनी स्वतःचा अनुभव सांगीतला "माझे वडील वारले त्यावेळी मला आश्चर्य वाटले, मी निर्विचार झाले, अगदी निर्विचार झाले, जवळ जवळ तीन दिवस मी निर्विचार होते. दुःखाचा, शोकाचा, कोणताही विचार आला नाही. फक्त निर्विचार सर्वांना आश्चर्य वाटले, मीच वडिलांची सर्व काळजी घेत असे. त्यांनाही माझा फार लळा होता. मी फार आवडायची, सर्व काही होते." तेव्हां, तुम्ही सहज योगी अथवा सहज योगीनी असाल, तर संकटाच्या काळात निर्विचार व्हा. ती एक खूण आहे. याचा अर्थ काय? परमेश्वर तुम्हाला आंत घेतो, तुमच्या अडचणींनाही घेतो. परमेश्वर त्यांत हात घालतो, त्याचे संरक्षण देतो. व संकटातून तुम्हाला बाहेर काढून पूर्ण निर्विचार करतो. आणि जाणिवेच्या निर्विचार स्थितीमध्ये चूक काय व बरोबर काय हे तुम्हाला ओळखू येते. म्हणून संकटाच्या काळांत निर्विचारता फार सतर्क असते, सर्वसामान्य स्थितीपेक्षाही अधीक जागरूक असते.

आपण परमेश्वरी राज्यात आहोत आणि कोणत्याही प्रकारे आपण दुःखी नसतो. जीवनांत काही घटना घडतात. जीवन असेच आहे. कोणालातरी मृत्यु येणारच. प्रत्येकालाच एकावेळी मृत्यु येत नाही. जन्माला आलेल्या प्रत्येकाला मरण हे येणारच. पण लोकांनी मृत्युलाही जीवनाचे एक मोठे अंग बनविले आहे. वास्तविक तो एकच क्षण आहे, फक्त एकच क्षण आहे. तुम्ही बाहेर पडता, जाता आणि बदलून परत येता, पण या जीवनांत जर तुम्हाला काही करायचे असेल, तर ते म्हणजे आनंद घ्यायचा.

ख्रिश्चन धर्मांनी मृत्यु विषयी फारसे सांगितले नाही. ख्रिस्ताला त्या लोकांनी जिवंत राहू दिले असते तर त्यांनी सांगितले असते. परंतु त्यांनी आत्मा अमर आहे हे सांगितले आहे. आणि निश्चितपणे पुनर्जन्माविषयी सांगितले आहे.

या जीवनकाळात तुमचे उत्थान व परमेश्वरी राज्यातील स्थान, यांना सर्वोच्च स्थान आहे. विशेषतः स्त्रियांना मला सांगायचे आहे, शोकान्तिका वाचण्याचा स्त्रियांच्या नसांवर परिणाम होतो. थोडेसे कांही कोणी म्हणाले, की जणूकाही बॉंब फुटल्यासारखे होते. स्वतःचे आपण किती नुकसान करतो ते प्रथम पाहिले पाहिजे. पश्चिमेकडे अनेक महिलांनी आपली जीवने उध्वस्त केली आहेत. पण त्याचे बद्दल त्या कधी रडत नाहीत.

परंतु पूर्वेकडे आणि पश्चिमेकडे अनेक शहाण्या स्त्रिया मी बघितल्या आहेत. त्यांचा संयम फार मोठा असतो. आणि जीवनाबद्दल त्यांची प्रवृत्ती राजा सारखी असते. हत्ती चालत असताना कुत्रा भुंकला तर काय बिघडले? तुमच्या अंतर्यामी जेव्हा आनंद असतो तेव्हां ती राजेशाहीवृत्ती येते.

तुमचे तत्त्व हवे, "मला कोणी दुःखी करू शकत नाही." नाहीतर तुम्ही डावीकडे जाऊ लागता. रडणे ही पण अहंकाराची आणखी एक अभिव्यक्ति आहे. स्त्रीया रडू लागल्यावर पुरूष डाव्याबाजूस जाऊ लागतात व मग पझेस्ड होतात. म्हणून आज मला तुमच्या सर्वांकडून एक वचन हवे आहे की तुम्ही आजीबात रडणार नाही. फुले देण्याऐवजी तुम्ही मला वचनस्वरूपी फुले द्या की, "मी केव्हाही रडणार नाही." अर्थात केव्हातरी "सांद्र करूणा" स्थितीत एक-दोन अश्रू येतील. शेवटी मी आई आहे. पण याचा अर्थ बसून रडावे व हिस्टेरिकल व्हावे असा नाही. म्हणून तुम्हाला रडायला लावणारी शोकांतिक पुस्तके वाचू नका तर गहन पुस्तके वाचा, अंतःकरणाला स्पर्श करणारी पुस्तके वाचा, मग थोडे रडावेसे वाटले तर ठीक आहे.

तेव्हा, आज आपण आनंद लुटण्यासाठी येथे जमलो आहोत. आत्मानंद, निरानंद, परमानंद. ज्याचे मोल चिरंतन आहे. तुम्ही आता हे लक्षात घ्यायला हवे आणि पूर्ण विश्वास ठेवायला हवा की तुम्ही आता परमेश्वराच्या राज्यांत आहात. तुमच्या अंतरंगातील सूक्ष्म सौंदर्ये तुमच्यासाठी उघडी केली जात आहेत. परंतु तुमचे डोळे आधीच बंद असतील, तुमचे हृदय आधीच बंद असेल, सुंदर, सुंदर गोष्टी तुम्हाला पहायच्या नसतील, तर "किती सुंदर गोष्टी बनविल्या आहेत" असे तुम्ही कसे म्हणाल? जीवनात होकारात्मक (पॉझीटीव्ह ॲटिट्यूड) प्रवृत्ती असणे व स्वतःला आंतून विकसित करणे महत्त्वाचे आहे.

# मद्रास जाहीर सभा

## दि. ६-१२-१९९१

## श्री माताजी निर्मला देवींचे भाषण (सारांश)

आपण खरोखरीच सत्याचे शोधक असलो तर त्याविषयी आपण प्रामाणिक असलं पाहिजे. आणि आपल्याला त्याबद्दल कळकळ असली पाहिजे. आणि या जगतांतील आपल्या स्वतःच्या अस्तित्वाला आपण न्याय दिला पाहिजे. अनेक साधक आहेत, कोणी कर्मकांडे करीत आहे, तर कोणी ध्यान, कोणी भक्ती तर कोणी वाचन. आपण काय साधलं आहे, हे प्रत्येकाने जाणलं पाहिजे. आपण कुठे आहोत? आई या नात्याने मी म्हणेन, "माझ्या बाळा, तुझ्या साधनेमध्ये तूं इतकं काही केलंस पण तुला काय सापडलं? अंतिम सत्य तुला गवसलं कां? पवित्र ग्रंथांमध्ये वर्णन केलेलं कांही तुला मिळालं कां? संत नामदेव साधे शिंपी होते. गोरा कुंभार या दुसऱ्या एका संतांना भेटायला ते गेले. नुसतं त्यांच्यासमोर उभं राहून ते म्हणाले, "निर्गुण (निराकार) पहायला मी इथे आलो पण तो मला इथे सगुणांत (साकार) दिसतो आहे. फक्त एक आत्मसाक्षात्कारी व्यक्ति किंवा संत दुसऱ्या संताबद्दल असं बोलूं शकेल कारण त्यालाच अंतिम सत्य महित असतं. ज्यांनी आत्मानुभव घेतला नाही त्यांना या जीवनापलिकडचे सत्य काय ते समजूं शकत नाही. ख्रिश्चन धर्मातही थॉमस आहे, जो भारतांत आला आणि त्यांने कांही प्रबंध लिहिले, जे इजिप्तमधील गुहेमध्ये ठेवले होते. ते सापडले. अठ्ठेचाळीस वर्षाच्या संशोधनानंतर त्याच्याबद्दल एक पुस्तक लिहिलं आहे. कशाप्रकारे त्याने सतत सहजयोगाचेवर्णन केले आहे ते आश्चर्यजनक आहे.सत्याचा अनुभव तुम्ही घेतलाच पाहिजे, असे आहे ते.

प्रत्येक धार्मिक ग्रंथ म्हणतो स्वतःला जाणा. मी कोण आहे? जेव्हा असं म्हटलं जातं, तेव्हा प्रत्येकाने तो स्वतःमधला "स्वतः" जाणण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आपण म्हणतो, माझं शरीर, माझं नाक, माझा देश, "मी" हा मी कोण, जो नेहमी विचार करतो? ही स्वयंस्फूर्ति कुठून येते. हा "मी" आपल्यामध्ये असतो. आपल्या हृदयामध्ये परावर्तित झालेला असतो. कांही एक गृहीत धरा आणि जर ते सिद्ध झालं, तुम्हाला सापडलं, जाणवलं, त्याचा अनुभव आला तर प्रामाणिक माणसाप्रमाणे तुम्ही त्याचा स्विकार केला पाहिजे. पाश्चात्य लोकांना वेगळीच अडचण आहे, परंतु एकदाकां त्यांना अनुभव आला की, ते युनिव्हर्सिटीत जातील, वेगवेगळ्या लायब्ररीत जातील आणि कुंदलिनीबद्दल सर्व कांही शोधून काढतील. नाथ पंथीयांनी कुंडलीनी जागृती बद्दल खूपच काम केलेलं आहे. पण ते सगळं हरवलं गेलं. नंतर जर्मन आले, त्यांना तांत्रिक लोकांनी पूर्णपणे चुकीची माहिती दिली. ईश्वरी अस्तित्वाबाबत तीन प्रकारच्या चळवळी झाल्या. एक म्हणजे वेद. वेद म्हणजे जाणणे. अशा लोकांना थॉमसने "नॉस्टिक्स" म्हटले आहे. ग्नॉ म्हणजे ज्ञान, मानसिक अथवा भावनिक ज्ञान नाही. पण कांहीतरी त्याच्या खूप पलिकडलं. आणि त्या मार्गाचा त्यांनी प्रयत्न केला. वेदामध्ये पहिल्या श्लोकामध्येच ते म्हणतात, जर तुला हे ज्ञान नसेल तर हे पुस्तक वाचण्यांत अर्थ नाही. माहित असणे म्हणजे काय? तुमच्या मध्यमज्ञासंस्थेवर जाणणे. तुमच्या मानसिक किंवा शारिरीक पातळीवर नाही. आपण मानव झालो असल्याने विनम्रतेने आपण म्हटलं पाहिजे की, आम्ही परिपूर्ण नाही. कांहीतरी राहिलं आहे. नाहीतर तुम्ही कां झगडतां, भांडता? भौगोलिक, आर्थिक, राजकीय प्रश्न कां आहेत? मग आपण या सगळ्याचं मूळ कारण जे मानवप्राणी त्याकडे येतो. मग या मानवांत काय बिघडलंय? जनावरे पशू असतात. ती देवाच्या ताब्यांत असतात. पाशांमध्ये असतात. पण मानवाला स्वातंत्र्य आहे. आणि तो इकडे तिकडे भटकतो आहे. हे प्रश्न आहेत, कारण त्यांना खरं ज्ञान नाही. आपण सर्वांनी खरं ज्ञान जाणून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. वेदशास्त्रानुसार त्यांनी निसर्गाला जाणून घेण्याचा प्रयत्न केला. पंचतत्त्वांना जाणून घेण्याचा प्रयत्न केला, ज्याला आपण उजवीकडची चळवळ म्हणतो. ग्रीक लोकांमध्ये उजव्या बाजूकडची चळवळ चांगल्या प्रकारे दाखविली गेली आहे. डावी बाजू भक्ति होती. भारत चांगलाच आशिर्वादित आहे. कारण संतांकडून ज्ञान आले, जरी ते ज्ञान मार्गापासून बरेचसे दूर गेलेले आणि सांचलेले झाले आहे. भारताविषयी दुसरा चांगला मुद्दा म्हणजे भारतामध्ये धर्म हा संघटित केलेला नाही.

अशा प्रकारच्या कल्पना असतांना आणि वेद सुद्धा, एक प्रकारच्या मानसिक मायेमध्ये आपण गुरफटलो गेलो. आणि तशा प्रकारे आर्यसमाज वगैरे आपल्याकडे आहे. तशा लोकांनी तो मुद्द गांठला नाही आणि जे कांही त्यांनी वाचलं त्याविषयी ते समाधानी आहेत. कबीरांनी म्हटलं आहे, खूप जास्त वाचून पंडितही मूर्ख झाले आहेत. फार जास्त वाचून अंतिम सत्य तुम्ही जाणू शकत नाही. समजा एखादा डॉक्टर. आहे, ज्याने तुम्हाला औषध लिहून दिले, ते तुम्ही घेतले पाहिजे. डोकेदुखीसाठी घेतले पाहिजे. वेदांमध्ये आणि उपनिषदांमध्ये लिहिलं आहे, ते हे कीं तुम्ही स्वतः शोधून काढले पाहिजे. वेदांमध्ये आणि उपनिषदांमध्ये लिहिलं आहे, ते हे की तुम्ही स्वतः शोधून काढले पाहिजे. पतंजली शास्त्रातही, सहजयोगांतही आपण हे तत्त्व वापरतो पण प्रश्न किंवा बांधा समजून शास्त्रांतही, सहजयोगांतही, आपण हे तत्त्व वापरतो, पण प्रश्न किंवा बाधा समजून घेऊन! आपलं अस्तित्त्व फक्त शारिरीक, मानसिक, किंवा भावनिक नाही, तर आत्मस्वरूपही आहे.

या देशांत चालणारी दुसऱ्या प्रकारची चळवळ आपल्याकडे आहे, ती म्हणजे भक्ति, देवळांत जाणे वगैरे. पण ती सुद्धां ढासळत चालली आहे. भक्ति म्हणजे काय? श्रीकृष्ण परस्परसंबंध हाताळण्यांतील चातुर्यामध्ये नैपुण्य असलेले, असे होते. आणि आई नव्हते. लोकांनी सत्य शोधायला आजूबाजूला भटकून यावं अशी त्यांची इच्छा होती,

कारण कोणालाही सरळ सरळ प्रामाणिकपणाने केलेलं विधान आवडत नाही. त्यावेळी त्यांनी फक्त अर्जुनाला सांगितलं, तीन गोष्टी त्यांनी सांगितल्या, प्रथम "तुम्ही ज्ञानाप्रत गेलं पाहिजे." ज्ञान म्हणजे हे तुमच्या मध्यमज्ञासंस्थेवर मिळणारं ज्ञान. दुसरी गोष्ट, तुम्ही भक्ति केली पाहिजे. आणि जे कांही फळ, फूल, किंवा पाणी तुम्ही मला द्याल. ते मी घेईन. पण तुम्ही ती भक्ति केली पाहिजे जी "अनन्य"आहे. त्याचा अर्थ, तिथे दुसरं कोणही नाही. जेव्हां, तुम्ही आत्मसाक्षात्कारी आहांत, जर तुम्ही निगडीत नसाल तर भक्ति कसली?

अनेक लोक तक्रार करतात. "मी उपास करतो, जप करतो, हे करतो, ते करतो, आणि माझी परिस्थिती पहा. ती कांही देवाची चूक नाही. तुमचं अजून संधान लागलं नाही. जसं, टेलिफोन जर लागलेला नसेल तर, फोन करण्याचा काय उपयोग? संधान नसतांना असलेली भक्ति चूक आहे. त्यामुळेच श्रीकृष्ण म्हणाले, "योगक्षेमवहाम्यहम" प्रथम योग मिळवा - एकीकरण - संघटन. त्यानंतर तुम्हाला क्षेम मिळेल. हित साधले जाईल, कर्मासंठी त्यांनी म्हटलं, "सर्व कार्य करा आणि ते सर्वशक्तिमान परमेश्वराच्या चरणांशी अर्पण करा." खूप लोक म्हणतात, माझं सगळं कार्य ईश्वरचरणी समर्पित केलं आहे. खुनी देखील! ती फक्त एक मानसिक कल्पना आहे. तुम्ही ते करूं शकत नाही कारण, अजून तुम्ही त्या स्थितीला नाही. पण,एक सहजयोगी म्हणणार नाही की, मी कुंडलिनी चढवतो, तो म्हणतो, "ती आली नाहीवर" तो तृतिय पुरूषांत बोलतो, कारण तो स्वतः तिथे नसतो. हे असं कर्म आहे, जे आपोआप सर्व शक्तिमान ईश्वराच्या चरणी पोहोचतं. सर्व कांही तो करीत असतो आपण फक्त साधनं आहोत. ते आपोआप आणि तत्क्षण घडतं आणि ते सहज आहे.

तुम्हां सर्वांमध्ये या शक्त्या आहेत. कुंडलिनी ही फार भयानक गोष्ट आहे, असं वर्णन करणारी पुस्तकं आहेत. ते पूर्णपणे निरर्थक आहे. मी अनेक देशांत गेले आहे. आणि अनेक लोकांना साक्षात्कार दिला आहे, आणि त्यांना त्रास झाल्याचं कोणतंही चिन्ह नाही हे त्याउलट, प्रत्येक प्रकारे ते सुधारले आहेत. रात्रभरांत लोकांनी ड्रग्ज, वाईट सवयी सोडून दिल्या आहेत. रात्रभरांत लोक रोगमुक्त झाले आहेत. मी कांहीही करीत नाही. तुमची स्वतःची कुंडलीनी ते कार्यान्वित करते. ती तुमची आई आहे. तुमची एकुलती एक खरी आई आहे. आणि तिला तुमच्या बद्दल सारी माहिती आहे. ते सगळं तिच्यामध्ये मुद्रित झालेलं आहे. ती साडेतीन वेटोळ्यांमध्ये तुमच्यामध्ये आहे. जेव्हा ती उत्थान पावते तेव्हा, कदाचित ती थोडीशी उष्णता देईल, कारण तिला कराव्या लागणाऱ्या थोड्याशा धडपडीमुळे. ही उष्णता फक्त कांही थोड्या लोकांमध्ये जाणवते. तुम्हां सगळ्यांकडे कुंडलिनी आहे. आणि ती तुमच्यामधील इच्छा आहे. अर्थशास्त्राचा नियम असे सांगतो की, सर्वसाधारणपणे इच्छाचे समाधान होत नाही. आज आपल्याला घर हवं असतं, उद्या गाडी, त्यानंतर हेलिकॉप्टर, अशा प्रकारे सुरूच रहातं. आपल्याकडे नसतं, त्यावेळी ते मिळविण्यासांठी आपण धडपण करतो. आणि जेव्हा आपल्याकडे असतं, त्यावेळी आपल्याला त्याची मजा येत नाही. पण ही शुद्ध इच्छा आहे. अशी की, या सर्वत्र असणाऱ्या ईश्वराच्या प्रेमशक्तिशी एकरूप व्हावं.

सर्व कांही निर्मिती आपल्या दृष्टोत्पत्तिस येते. सुंदर फुलं, एका लहान छोट्या बी मधून बाहेर येणारा मोठा वृक्ष. आपल्या डोळ्यांकडे पहा. किती सुरेख कॅमेरे आहेत ते. त्यांना कोणी तयार केलं? या स्थितीपर्यंत कोणी आपली उत्क्रांती केली? ती कोणती शक्ति आहे, जिने आपल्याला मानवप्राणी बनविलं? आपल्याला शोधलं पाहिजे कारण शास्त्र याच स्पष्टीकरण देऊ शकत नाही. बी कशाप्रकारे अंकुरतं? आपण कशा रितीने माणूस बनतो? सर्वशक्तिमान ईश्वराने हे सुरेख ब्रम्हचैतन्य सगळीकडे पसरले पाहिजे. तसं जर असेल तर, तुम्ही अनुभवलं पाहिजे. आणि पडताळून पाहिलं पाहिजे. पण नुसतेच नाही म्हणणे म्हणजे, त्या जिवंत शक्तिशी स्वतःबरोबर निगडीत होण्याची संधी नाकारणे असे आहे. या जिवंत शक्तिने आपली उत्क्रांति केली आहे. ती संघटीत करते. सर्व निर्मिती करते. सर्व गोष्टींना चैतन्य प्रदान करते. तुमच्या बरोबर कुठवर जायचं त्याचा विचार ती करते. इतकी सुरेख शक्ति सगळीकडे आहे. प्रत्येक अणूमध्ये, प्रत्येक जिवंत समुहांत, प्रत्येक जिवंत अस्तित्वात, ती इतक्या सुरेख तऱ्हेने कार्य करते, की तिचा हळुवारपणा आपल्याला समजत देखील नाही. फूल धरतांना, उमलतांना, उघडतांना आपण पहातसुद्धा नाही. इतक्या माधुर्याने सुंदररित्या ते होतें की, कोणत्याही प्रकारे त्याचं अस्तित्व आपल्याला जाणवत सुद्धां नाही.

जोपर्यंत त्या शक्तिशी आपण निगडीत असत नाही, तोपर्यंत अंतिम सत्य आपण जाणूं शकत नाही. कारण आपल्यामधील आत्मा आपल्या चित्तामध्ये नसतो. पण एकदा कां, ही कुंडलिनी उत्थान पावली, ती सहा चक्रांमधून जाते, टाळूच्या जागी छेदन करते, जो बॅप्टीझमचा, द्विज होण्याचा, खरा अविष्कार असतो. त्यानंतर हा आत्मा प्रकाश बनून आपल्या चित्तामध्ये येतो. आणि आपल्या नसांना नवी जाणीव मिळते ज्यामुळे आपण सामुहित चेतनेमध्ये उतरतो. सामुहिक चेतना, तुम्ही इतरांना जाणू शकता. तुमच्या बोटांच्या टोकांवर जाणूं शकता. सात चक्रे डाव्या बाजूला आहेत. सात चक्रे उजव्या बाजूला आहेत. डाव्या बाजूची सात चक्रं तुमच्या भावनिक बाजूचे प्रतिनिधीत्व करतात. आणि ही उजवी बाजू तुमची शारिरीक आणि मानसिक बाजू दर्शविते. सर्व लोकांची चक्रे तुम्हाला जाणवतात. वैद्यकीयरित्या जेव्हा आपण लोकांवर उपचार करतो, त्यावेळी आपण झाडावर बाहेरून उपचार करत असतो. आपण पानांवर उपचार करतो. पण तुम्हाला खरोखर झाडावर उपचार करायचे असतील तर तुम्हांला मुळापाशी जायला हवं. ही आपल्यामधली मूळं आहेत आणि हा जीवनाचा वृक्ष आहे.


महंमदसाहेबांनी देखील कियामा किंवा रिसरेक्शनची वेळ वर्णन केली आहे. "जेव्हा रिसरेक्शनची वेळ येईल तेव्हा तुमचे हात बोलतील आणि तुमच्या विरूद्ध साक्षीदार होतील." या वेळेविषयी त्या सर्वांनी सांगितलं आहे. शेवटचा निवाडा आणि हे कलियुग कांहीतरी पुढे आणीत आहे. पण ते घ्यायला कितीजण तयार आहेत? हजारोंच्या हजारो कोणत्यातरी वेडेपणाच्या हव्यासामागे चालले आहेत. पण सत्यामागे नाही. हे समजण्यांसाठी एक प्रकारची दैवी बुद्धी लागते. यासाठी सर्वात जास्त स्विकारण्यास तयार असलेलं राष्ट्र रशिया आहे, असं मला आढळलं. ते

अतिशय आत्मिपरिक्षण करणारे लोक आहेत. कमीत कमी एका जागी तरी बावीस हजार सहजयोगी आहेत. मी तिथे असतांना राज्यक्रांती झाली होती. "तुम्ही अस्वस्थ झाला नाही?; मी विचारलं ते म्हणाले, अस्वस्थ होण्याची काय गरज आहे? आम्ही देवाच्या राज्यांत आहोत. आम्ही या देशाचे नाही आहोत."

आपल्या भारतीयांचा एक प्रश्न आहे, आपण फार कंडिशन्ड आहोत. आपल्या समोर असे आदर्श आहेत. पण आपण कधीही महत्त्वाकांक्षा बाळगीत नाही. आपण रामाची अथवा गुरूची उपासना करू पण तुमच्या मध्ये, तुम्ही काय मिळवलं? तुम्ही कशालातरी पकडून आहांत. आणि तीच तो सहजयोग आहे, जिथे जोपर्यंत, तुम्ही जाणीत नाही तो पर्यंत, तुम्हाला श्रीराम माहीत नसतात. तुम्हांला कोणीही माहीत नसतं. त्या दिवशी मी कोणा वेड्या माणसाने लिहिलेलं योगावरचं पुस्तक पाहिलं. तो राम, कृष्ण, ख्रिस्त आणि सर्वांचं अस्तित्व नाकारतो आहे. ते अतिशय अशास्त्रिय आहे. शोधून काढल्या शिवाय तुम्ही कसं म्हणू शकता? समजा, मी मद्रासला आले नाही, आणि मद्रासचं वर्णन करू लागले तर, तुम्ही मला काय म्हणाल? त्याचप्रकारे अनेक लाकांनी देवाबद्दल लिहिलं आहे कारण त्यांना लिहिण्याला प्रतिबंध करणारा कायदा नाही निरर्थक लिहू शकतो. आपल्याला सत्य मिळाल्याशिवाय कोण खोटा गुरू आहे आणि कोण नाही हे कळणार नाही. तुम्हाला कळेल. विचारण्याची गरज नाही. त्यामधून तुम्हाला अंतिम सत्य कळेल. कारण तुम्ही आत्मा आहांत तो अंतिम सत्य देतो.

आपल्या देशामध्ये असलेली तिसऱ्या प्रकारची चळवळ म्हणजे नाथपंथी. जैनांमध्ये आदिनाथ आहे. त्यामध्ये एका गुरूने फक्त एका व्यक्तिला ज्ञान द्यायचं असतं. जसा जनकाचा फक्त नचिकेत होता. ज्ञानेश्वरांच्या वेळेपर्यंत म्हणजे १२ व्या शतकापर्यंत. ज्ञानेश्वरा त्यांच्या स्वतःच्या भावाचे शिष्य होते. त्यांनी त्यांच्या भावाकडे सर्वसामान्य जनांना सत्य सांगण्यासाठी परवानगी मागितली. "कारण, तेरा, चौदा हजार वर्षांपूर्वी मार्कण्डेयांनी कुंडलिनीचं वर्णन केलं आहे पण सगळं संस्कृत भाषेत, संस्कृत सामान्य जनांना उपलब्ध नव्हती. त्यामुळे हे ज्ञान सर्व वेळ गुपितच ठेवलं गेलं होतं. ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी लिहिली, जी एक प्रकारची मराठी गीता होती ती वाढविली होती. असंख्य काव्याने सुशोभित केली गेली होती. सहाव्या अध्यायांत कुंडलिनीचं वर्णन केलं गेलं आहे. धर्म संघटीत करणाऱ्यांनी सहाव्या अध्यायांत कुंडलिनीचं वर्णन केलं गेलं आहे. धर्म संघटीत करणाऱ्यांना सहाव्या अध्यायाला निषिद्ध मानलं. धर्ममार्तंडांनी तो वाचण्याची मनाई केली. अशाप्रकारे हा अध्याय बंद झाला. आणि त्याविषयी कोणालाही कळलं नाही. नाथ पंथीयांना त्याविषयी माहित होतं. त्यांच्यापैकी आपल्याकडे कबीर आणि नानक आहेत. नानक "खलीस" बाबत बोलले. खलीस म्हणजे शुद्ध, निर्मल. सहजयोगी निर्मल आहेत. खलीस लोक असे असू शकत नाहीत. ते हिंसक असू शकत नाहीत. ते प्रेम आहे. जे पूर्णपणे निर्व्याज आहे. व्याज नसलेलं, ते अनिर्बंध प्रेम आहे. भेदभाव नसलेले प्रेम आहे. जशी जीवनरसामध्ये शक्ति वर उठते आणि झाडाच्या सर्व भागांकडे जाते, फुलाफळांकडे जाते आणि परत येते, कोणा एकाला चिकटत नाही. जर तुम्ही एकाला चिकटलात, तर तो पूर्ण वृक्षाचा मृत्यू असेल. आपण जाणलं पाहिजे की ही सगळी महान अवतरणं, द्रष्टे, प्रेषित त्याच जीवनवृक्षावरून या धरतीवर आले. त्या सर्वांवर तुम्हाला विश्वास ठेवला पाहिजे. ही उत्क्रांतीची जिवंत क्रिया आहे. शेवटची फळी फोडून जाण्याची क्रिया आहे. मानवप्राणी होण्यासाठी तुम्ही कांहीही केलं नाही. त्याचप्रकारे हे देखिल विनासायास आहे. ते सहज आहे.

देव तुम्हाला आर्शिर्वाद देवो.



# मद्रास जाहीर सभा

## दि. ७-१२-१९९१

## श्री माताजी निर्मलादेवीचे भाषण (सारांश)

सगळ्या पुराणकथा हास्यास्पद नाहीत. नव्वद टक्के खरोखर जसे होते, तसे आहे. आपण देवळांत जातो. देवळात जाणं फार चांगल, असं आपल्याला वाटतं. पण आपण काय करीत आहोत. आणि पुजा का करतो, ते आपल्याला माहित नसतं. आपण कोणाची पुजा करतो? या देवता काय आहेत? आपल्यामध्ये त्या कशा प्रकारे कार्य करतात, त्याचं काम काय? त्यांना कसं काय प्रसन्न करायचं.

आत्मा हे सर्वशक्तिमान परमेश्वराचं प्रतिबिंब आहे. देव फक्त एकच आहे. जो ते परावर्तित करीत असतो, "सदाशिव". आदिमाता - जी आदिशक्ति तिच्या कार्याचा साक्षी आहे. सदाशिव, तुमच्यामध्ये आत्मा म्हणून साक्षीभावाने ते आहेत. पण तुमच्या चित्तामध्ये ते आलेले नाहीत. कोणत्याही प्रकारे तुमच्या स्वातंत्र्यात त्यांनी मध्ये पडू नये यासाठी त्याचं चित्त मर्यादित आहे. ते स्वतः मध्येच रहातात आणि फक्त निरीक्षण करतात. आणि तेच "स्वयं" आहे, आत्मा. ते फक्त एका सदाशिवांचं प्रतिबिंब आहे. त्यामुळे अर्थातच सर्व प्रतिबिंबे सारखी असली पाहिजेत. त्यांचा प्रभाव सारखा असला पाहिजे. आत्मसाक्षात्कारानंतर तुम्ही परावर्तक बनता. "रिफेलेक्टर", प्रत्येकजण तीच गोष्ट परावर्तित करतो. व्यक्तिला हातांवर शीतल हवा जाणवते. त्यानंतर तिला ती टाळूप्रदेशांतून जाणवते. प्रत्येकाला ती तशाच प्रकारे जाणवते. आणि ते त्यानंतर त्यांना ती चक्रे जाणवतात. आणि काय अयोग्य आहे. चूक आहे, ते जाणवते. आणि ते सगळे निर्विचार जाणिवेत जातात. पहिली पायरी, जिला तुम्ही निर्विचार समाधी म्हणता, ते तत्क्षण कार्यान्वित होते. "माताजी, ते फार कठीण आहे," असं तुम्ही म्हणू शकता, लोकांना हिमालयामध्ये जावं लागायचं, ते दिवस आता गेले आहेत. शेवटी संस्कृतीचा वृक्ष किती मोठा वाढला आहे, त्याच्या मूळांना वाढायचं आहे. नाहीतर पूर्ण संस्कृति रसातळाला जाईल. नष्ट होईल.

हे मूळांविषयीचं ज्ञान आहे. आणि म्हणूनच हे ज्ञान मिळविण्यासाठी तुम्हाला सूक्ष्म व्हायला हवं. हे शक्य तेव्हांच आहे जेव्हां, कुंडलिनी उत्थान पावून, तुमच्या टाळूच्या मधून भेदन करून, सर्व विश्वव्यापी परमेश्वरी प्रेमशक्तिशी संधान साधते. पहिल्यांदा तुम्हाला जाणवते ती सामुहित चेतना, कारण प्रत्येकजण आत्मा आहे. त्यामुळे दुसऱ्या आत्म्याची जाणीव तुम्हाला होऊ शकते. त्याचं शरीर मन वगैरे तुम्ही जाणूं शकता. ही पहीली गुणवत्ता तुमच्या मध्यमज्ञारज्जूवर तुम्हाला प्राप्त होते.

तुमच्या उत्क्रांतीमध्ये तुम्ही जे कांही मिळवलं आहे, ते तुमच्या मध्यमज्ञासंस्थेवर व्यक्त होतं. उदा. तुमच्याकडे कुत्रा किंवा घोडा असेल. आणि तुम्हांला त्याला घाणेरड्या बोळामधून न्यायचं असेल, तर तो जाईल पण एखाद्या मानवप्राण्याला ते कठीण आहे. आपल्या उत्क्रांतीमध्ये मध्यमज्ञासंस्थेत सौंदर्य, गंध यासारख्या संवेदना, विकसित झाल्या आहेत. आपण मानवप्राणी आपल्या सूक्ष्मतर संवेदनेबाबत आणि उत्क्रांतीबाबत इतर प्राण्यापेक्षा नक्कीच उच्चस्तरावर आहोत. तुम्ही काय सुशोभित करता, कोणता रंग परिधान करता, याविषयी कुत्र्याला पर्वा नसते. आपल्याला ते महत्त्वाचं असतं कारण आपली संवेदना सुधारली आहे.

मानवी अवस्थेमध्ये आपल्याला एक प्रश्न आहे तो म्हणजे आपल्या डोक्यांत आपण दोन संस्था विकसित केल्या आहेत. अहंकार आणि प्रतिअहंकार. आपल्या डोक्यामध्ये त्या एकमेकांना ओलांडून पलिकडे जातात. आणि वर्गीकृत होऊन, आपण एक बंदिस्त व्यक्तिमत्त्व बनतो. ज्यावेळी कुंडलिनी उत्थान पावते तेव्हां, ती आज्ञाचक्रावरून-जे ऑप्टीक चाइसमावर आहे - त्यावरून पुढे जाते आणि या दोघाचे, अहंकार प्रतिअहंकार याचे शोषण करते. आणि सहस्त्रार उघडते. त्यानंतर वर जाते, ही जिवंत देवाच्या, जिवंत शक्तिची जिवंत क्रिया आहे. ही कुंडलिनी तुमची माता आहे. आई आहे. तुम्हाला त्रास न देतां, सुरेखरित्या ती हालचाल करते. तिचं मूल तिला चांगल्याप्रकारे माहित असतं, सर्व जीवनांमध्ये तिने तुमच्यावर प्रेम केलं आहे.

ज्यावेळी ब्रम्हरंध्राचे, तुमच्या मस्तकावरचे श्री. सदाशिवाचे स्थानाचे भेदन केले जाते, त्यावेळी आपण श्री सदाशिवांचे पदस्पर्श करतो. आणि ते आपल्या चित्तामध्ये प्रवेश करतात. जेव्हां आत्मा आपल्या चित्तामध्ये प्रवेश करतो, त्यावेळी आपलं चित्त आलोकित होतं. हे चित्त फार दक्ष असतं. त्याला सर्व काही माहित असतं. चक्रांवर लोकांविषयी माहिती तुम्हांला कळू शकते. तुम्ही काय कपडे करतां किंवा त्यांच्याकडे बँकेत किती पैसे आहेत याबद्दल चर्चा नको, पण त्यांच्या चक्रांवर ते कुठे आहेत ते, ते बघतील. तुम्ही त्यांना रोगमुक्त करू शकता, पण त्यांना या अखिल विश्वव्यापी शक्तिसमवेत असलं पाहिजे.

प्रथम तुम्ही निर्विचार होता. इतरांना आत्मसाक्षात्कार देऊन तुम्ही तुमची सामुहिक चेतना कार्यान्वित करता. अडचण तर हीच आहे की, तुम्हाला सिंहासन दिले आहे आणि त्यावर बसविले आहे, पण तरीहि तुम्ही राजे आहांत यावर तुम्हाला विश्वास ठेवायचा नाही. आत्मविश्वास हा फार कठीण आहे. आपल्याला आत्मसाक्षात्कार मिळाला आहे यावर लोकांचा विश्वास बसत नाही. त्यांना भिती वाटते, पण हे सारे भयानक लोक, ज्यांना साक्षात्कार नाही, ज्ञान नाही, ते मोठे गुरू झाले आहेत. त्यांच्यामागे हजारो लोक लागले आहेत. त्यांना लोक मूर्ख ठरवितात त्यांच्यावर पैसे करतात. त्याचे जीवन खराब करतात.

आत्म्याचा दुसरा स्वभाव म्हणजे सामुहित अस्तित्व. "हे चांगलं, हे वाईट, हे आणि ते." त्याचा अर्थ - जर तुम्ही तुमचे हात फोटोकडे

केले आणि ते आत्मसाक्षात्कारी माणसाने केलेलं असेल तर तुम्हाला व्हायब्रेशन्स मिळू लागतील. सर्व गोष्टी सिद्ध करतां येतील. सर्वांसाठी प्रमाण आहे. हे चित्तदेखील स्वच्छ होत. तुमची अडचण देखील कुठे आहे. ते त्याला ठाऊक असतं. कोणतं चक्र बाधित आहे ते सुद्धा. दिल्लीमध्ये त्यांनी तीन मुलांना आणलं आणि म्हणाले "यांची आज्ञा पकडते आहे." आणि ती आम्ही स्वच्छ करू शकत नाही. याचा अर्थ ती मुलं अहंकारी आहेत, कारण तुमची आज्ञा दुखते आहे. त्याचा अर्थ तुमचा अहंकार दुखतो आहे. तुम्ही स्वतःच स्वतःचा निवाडा करू लागला. स्वतःमध्ये काय चूक आहे, ते तुम्ही जाणतं आहांत. त्यांना सर्वांना स्वतःबद्दल सर्व कांही माहीत आहे. कशाप्रकारे ते स्वच्छ करायचं. कसं कार्यान्वित करायचं तर, तुम्ही स्वतःला स्वच्छ करता. पण सर्वात जास्त स्वच्छता तेव्हां येते, जेव्हां तुम्ही सामुहिक बनता. अनेक लोक माझे फोटो घेतात, पुजा करतात आणि ध्यान करतात, पण तरीही त्यांना कांही त्रास होतो. तुम्हाला सामुहिकतेत राहिलं पाहिजे. सहजयोगाचा तो फार महत्त्वाचा भाग आहे.

आतां तुम्हाला हिमालयांत जायला नको आहे किंवा गंगेत उडी मारायला नको. उपास किंवा जप करावे लागत नाहीत. फक्त एक गोष्ट की सामुहिक व्हा. सामुहिकता हा परमेश्वराच्या चित्ताचा सागर आहे. एकदां का तुम्ही सामुहिकतेमध्ये आला की, तुम्ही स्वच्छ होता. इथे अहंकार येत नाही. कांही लोक फार मोठे आहेत, फार श्रीमंत आहेत, फार शिकलेले आहेत. त्यांना केंद्र असलेल्या छोट्यासाध्या जागेमध्ये यायला कठीण वाटतं. हे आईचं घर आहे. ते येत नाहीत आणि त्याचे व्हायब्रेशन्स संपुष्टात येतात. भारतामध्ये ही फारच सामान्य गोष्ट आहे. तसं पाश्चात्य देशांमध्ये होत नाही कारण किती अमूल्य गोष्ट त्यांनी मिळवली आहे, हे त्यांना माहित असतं. लोक म्हणतात, ते घरी ध्यान करतात. तुम्ही जर सामुहिकतेमध्ये आला नाही, तर तुम्ही तुम्हाला स्वच्छ करू शकत नाही.

जेव्हा कुंडलिनी तुमच्या आज्ञाचक्रामधून जाते त्यावेळी तुम्ही निर्विचार जाणिवेमध्ये येता. विचार उगवतो आणि खाली येतो. नंतर दुसरा विचार सुरू होतो. आणि संपतो, कांही भूतकालांतून, तर कांही भविष्य कालाबाबत विचार असतात. पण आपण वर्तमानांत नसतो. म्हणूनच कुंडलिनीचं जागरण ही अशी गोष्ट आहे, जी तुमचं चित्त आंत वेधून घेते. ज्यावेळी कुंडलिनी वर येऊन बसते त्यावेळी तिथे विलंब ही एक स्थिती येते. ती वाढते. तो वर्तमान असतो. आणि मग आपण निर्विचार असतो. वाढ त्यावेळी होते, जेव्हां तुम्ही निर्विचार जाणिवेत असता. आणि ती तुम्ही सामुहितेमध्ये किंवा तुमच्या ध्यानामध्ये मिळवूं शकता, ज्यांसाठी तुम्हाला पैसे द्यावे लागत नाहीत.

वास्तवता विकत घेता येत नाही. देवाला पैसे माहित नाहीत. पैसे त्याने केले नाहीत. ती तुमची डोकेदुखी आहे. जर मी हॉल घेतला तर त्यासाठी मला पैसे द्यावे लागतात. तेव्हा ते हॉलसाठी असतात. देवांसाठी नाहीत. जागृति आणि आत्मसाक्षात्कार यांसाठी आपण पैसे आकारू शकत नाही. लोक दर्शनासांठी सुद्धा पैसे आकारतात. जर पैसा हेच सर्वकांही असेल तर ते आत्म्याच्या पातळीपर्यंत कसे वर येतील? भक्त साधे भोळे असतात. अमेरिकेत एका गुरूकडे ४८ रोल्स रॉइस होत्या त्याला आणखी एक हवी होती. त्यामुळे त्याचे शिष्य रोल्स रॉईस घेण्यासाठी पैसे वाचवायला उपास करू लागले. एका सहजयोग्याने विचारलं तेव्हां त्यांनी उत्तर दिलं "आम्ही त्याला फक्त धातूची वस्तू देत आहोत, पण तो आम्हाला आत्मा देतोय" धातूची वस्तू आत्म्याबरोबर बदलता येतो कां?

देवाबरोबर नातं प्रस्थापित व्हावं लागतं. सर्वप्रथम आपल्याला आत्मा झालं पाहिजे. तरच हे नातं प्रस्थापित होऊ शकतं. आपण स्वतःलाच प्रशस्तिपत्र देऊ शकतो. पण त्याचा कांही उपयोग नाही. आपण मानवीजीवनाचं मूल्यमापन केलं पाहिजे. ते कशासाठी आहे? फक्त विमा काढण्यासाठी की, असं कांहीतरी, ज्यामुळे आपण जगामध्ये दिपक होऊन राहू? हा आत्म्याचा प्रकाश चित्तामध्ये पसरतो आणि चित्त प्रभावी, आणि कार्यरत होतं. जेव्हां तुमचं चित्त दमून जातं. त्यावेळी कंटाळा येतो. पण इथे चित्त प्रकाशाने भरलेलं असतं. आत्म्याचा स्वभाव असा आहे की, तो तुम्हाला सत्य सांगतो. जेव्हां तुमचं संधान पूर्ण असतं. त्यावेळी ती निर्विकल्पाची स्थिती असते. ज्यावेळी तुमचे चित्त पूर्णपणे बरोबर असतं. तुमचे व्हायब्रेशन्स बरोबर असतात. आणि तुम्हाला मिळालेली माहिती शंभर टक्के बरोबर असते. उदा. जर तुम्हाला श्री गणेशांविषयी माहिती हवी असेल, खूप लोक त्यांची थट्टा करतात. उदा. मुख्यत्वे बुद्धीमान लोक. ते पाप आहे. पण तुम्ही विचारू शकता, "गौरीपुत्र श्री गणेश आमच्या मुलाधारामध्येच बसलेले असतात, कां?" तुम्ही आत्मसाक्षात्कारी असाल, त्याचे एकदां नांव घेतलं तरी पुरे आहे कारण तुम्ही त्यांच्या राज्यात आहांत, तुम्ही जर निगडीत असाल तर नुसतं ते दैवत मदत करेल इतकेच नाही तर, तुम्हाला त्रास देणारे कांही असेल, तेही ठीक होईल. तुम्हाला जे हवं आहे ते होईल. सर्व प्रकारचे मनोरथ पूर्ण होतील. त्याला तुम्ही आत्मसाक्षात्कार म्हणा - परिपूर्ती म्हणा काही नांव द्या. ती तुमच्या अस्तित्त्वाची पूर्णपणे परिपूर्तता असते.

आत्म्याचा तिसरा स्वभाव म्हणजे तो प्रेम आहे. प्रेम असल्याने तो तुम्हाला आनंद देतो. पण निर्व्याज प्रेमाला आणखी कांहीच नको असतं. ते इतका शांत प्रकारची संवेदना देतं सगळा शीण निघून जावो.

हे आधुनिक शास्त्रांच्या वरचं शास्त्र आहे. पण तुम्हाला माहित आहे कां? की आपण भारतीय आहोत आणि हा आपला वारसा आहे. इंग्लीश भाषा आणि ज्ञान यांवर आपण जास्त विश्वास ठेवतो. त्यांना फ्रेंच माहित आहे, ते फ्रेंचवर विश्वास ठेवतात. आता अशी वेळ आली आहे की, त्यांनी आपल्या संस्कृतीवर, आपल्या ज्ञानावर विश्वास ठेवावा. सहजयोग फार प्राचीन आहे. त्यांत नवीन कांही नाही. नानकांनी म्हटलं आहे, "सहजसमाधी लागो" प्रत्येक संताने त्याचं वर्णन केलं आहे. आपल्याला व्हायचं आहे तो "आत्मा." आपल्या जीवनाचं तें अंतिम ध्येय आहे. आतां आपण नुसता विचार करू या की, आपण आत्मा बनूं या, आत्मसाक्षात्कारी बनूं या. स्वतःचेच स्वामी बनूं या.

ईश्वर तुम्हाला आशिर्वाद देवो.

# बंगलोर जाहीर सभा

## ९.१२.९१

## श्री माताजींचे भाषण (संक्षिप्त)

एक बीज वृक्षाला, या सुरेख आसमंताला जन्म देतं. हे वृक्ष, झाडी, झुडपं एका विशिष्ठ उंचीप्रत वाढतात. वैयक्तीकरित्या त्यांनी जे उत्पादन करायला हवं ते करतात. तुमचा डोळा पहा, तो किती गुंतागुंतीची गोष्ट आहे. जसा कॅमेरा आहे, किती गोष्टी करतो तो. आपण विचारही करीत नाही की, तो कशाप्रकारे इथे आला, इतक्या गोष्टी करतो आहे. सगळं काही आपण गृहीत धरुन चालतोय आणि शास्त्र तुम्हाला हे कसं काय होतं ते सांगत नाही, ते फक्त इतकंच सांगतं की, ते आहे! आपण अमिबापासून मानव स्थितीला आलो. पण आपल्याला पूर्णत्वाला पोहोचायचं आहे कां? हा आपल्या उत्क्रांतीचा शेवट आहे कां? तसा तो असता तर कांही प्रश्न नव्हता. आपण सगळे फार वेगळे लोक झालो असतो. सगळे एकमेकांना जाणणारे, तर, आपण धार्मिक पवित्र ग्रंथाकडे वळलो, जे म्हणतात, 'तुम्ही परत जन्मणार आहांत! काही म्हणतात, तुम्हाला आत्मबोध झाला पाहिजे, म्हणजे तुम्हाला मोक्ष  मिळेल, कांही म्हणतात, तुम्ही वली होणार. ते कशाबद्दल बोलत असतात? ती वेगळी जाणीव असणारी मोठी लोकं आहेत. ते मानवाच्या पूर्ण स्वरुपाचं वर्णन करीत आहेत, जे आहे 'आत्मा'. मानवाला सत्य शोधण्याचं स्वातंत्र्य दिलं गेलं आहे. सत्य शोधतांना आपण चुकलो असुं, पण ते सापडेपर्यंत आपण आनंदी, समाधानी होणार नाही. आणि त्याशिवाय ते मिळवणं आहेच पण आणखी, आपल्या उत्क्रांतीचा शेवटचा टप्पा तो आहे. जर आपण आत्मा झालो नाही, तर आपण पूर्ण होत नाही. आणि स्वतःशी व इतरांशी सतत झगडत रहातो. जो  पर्यंत आपण कोण आहोत, हे आपल्याला कळत नाही.

ही कुंडलिनी शुद्ध इच्छा आहे. बाकी इतर सर्व इच्छा अशुद्ध आहेत. समजा, तुम्हाला घर हवं असलं. त्यासाठी झगडलांत, घर घेतलं की, लगेच तुम्ही दुसरं कांही हवं होतं. कारण सर्वसाधारणपणे इच्छांनी समधानपूर्ति होत नाही. त्याचं कारण असं की, त्या शुद्ध इच्छा नसतात शुद्ध इच्छा आत्मा होण्याची असते. हे सर्व चैतन्यमय कार्य करणारं ब्रम्ह चैतन्य, त्याच्याशी निगडित होण्याची, असते. ते संधान प्रस्थापित केल्याशिवाय आपल्याला शांती लाभत नाही. ताण तणाव दुसरं काही नाही, तर ते होण्यासाठी चालणारी धडपड, हे सगळे रोग म्हणजे आपल्या चुकांमुळे झालेले. अशाप्रकारे की, आपण आंधळे आहोत, कारण आपल्याला ज्ञान नाही. तुम्ही पाप करीत नाही, पण तुम्ही दुर्लक्ष केलं आहे. जसं कबिरांनी म्हटलं आहे "मी त्यांना कसं सांगू कारण, पूर्ण जगच आंधळं आहे". तेविसाव्या वर्षी ज्ञानेश्वरांनी समाधी घेतली. ते तुमच्याशी बोलू शकत नव्हते. तुमच्या हिताच्या गोष्टी तुम्हाला सांगू शकत नव्हते. त्यामुळे इतके हताश झाले होते. याचं कारण रुढी, आचार विचार यांमुळे आपण इतके बांधले गेलो आहोत, कंडीशन्ड आहोत, डाव्या बाजूकडे आपण इतके बांधिल आहोत ते कर्मकांडामुळे. आपण एकाद्या धर्मात जन्मलो तर, आपण अमुक आहोत, असे समजतो. हा विचारही आपण करीत नाही की, सर्व धर्मांचा उगम एकाच स्त्रोतामधून झाला असणार. ही सर्व अवतरणे, संत वगैरे एकाच झाडावरची फुलं आहेत. आपल्याला वाटले, आपणच उत्तम. इतर सर्व भयानक. ते सर्व एकमेकांच्या नात्यांतीलच आहेत. ख्रिस्तांनी म्हटलं आहे, "ते, जे माझ्याविरूद्ध नाहीत, ते माझ्याबरोबरच आहेत. प्रत्येक धर्म नितीमत्तेचा प्रसार करण्याच्या महान तत्वांतूनच सुरू झाला. आणि आत्मसाक्षात्काराप्रत नेण्यासाठी, आत्मानुभूती, आत्मबोध, आणि मोक्ष आदीकडे नेण्यासाठी ते धर्म वाकडे वळत गेले, कारण त्यांना सत्य सापडले नाही.


त्यावेळेस तुम्ही त्या जाणिवेमध्ये उडी घेता, जिथे तुमच्याकडे सत्य पहाण्यासंबंधी पूर्ण प्रकाश असतो, त्यावेळी तुम्हाला हे सर्व कळतं. त्या सत्याचा स्त्रोत आहे "आत्मा." सत्य हे परीपुर्ण आहे. ते लाल आहे की काळे आहे, असे नाही. उदा. तुमच्याकडे दहा आत्मसाक्षात्कारी मुले असली, त्यांचे तुम्ही डोळे बांधले आणि या गृहस्थांमध्ये काय लागते आहे ते सांगा". असे विचारल्यास त्यांना त्या व्यक्तिच्या व्हायब्रेशनमध्ये जाणवते. (सेंट्रल नर्व्हस सिस्टिमवर) तशाच प्रकारे आपल्याला उत्क्रांतीमधला वरचा टप्पा गाठायचा आहे, ज्याला 'सामुहिक चेतना' अस म्हणतात. त्याचा अर्थ दुसरा कोण आहे? विश्वाची प्रतिकृतीच अखंड विश्व बनते. अखिल विश्वाचे तुम्ही अंगप्रत्यंग बनता. आणि जेव्हां तुम्ही कोणाचा विचार करता, त्यावेळी तुम्हाला तुमच्या बोटावर जाणवतं. तो जागा आहे, जिवंत आहे, जर तुम्हाला हे प्रश्न कसे सुधारायचे हे कळलं, तर तुम्ही त्या व्यक्तीला ठीक करू शकता.

त्यांत आत्मबोध असल्याने तुम्हाला तुमची स्वतःची चक्रे सुद्धां समजतात जी मूलतः सात आहेत, एकदां का तुम्हाला ही चक्रे कळली की, तुम्ही त्यांना बरोबर करू शकता, कारण ते अंतर्गत आहे. उदा. तुम्ही तिथे बसला आहांत आणि मी पांढरीसाडी घातली आहे, हे तुम्ही बघता. ती आहेच. मी तुम्हाला सांगायला नको. त्याचप्रकारे ती सहज गोष्ट आहे. या दैवी शक्तीबरोबर, ब्रह्मचैतन्या बरोबर संयोग होण्याचा मानव म्हणून तुमचा जन्मसिद्ध हक्कच आहे. आणि तो तुम्ही मिळवला पाहीजे. त्यासाठी आपण पैसे देऊ शकत नाही, हे आपल्याला कळलं पाहीजे. जर कोणी पैसे घेत असेल तर, तो फसवेगिरी करतो हे नक्की, पैसा तुम्ही  निर्माण केला. पण जेव्हां लोक देव विकू लागतात, ते मोठं

पाप आहे. हल्ली सर्व प्रकारचे खोटे गुरु झाले आहेत. सगळं पैशामागे धावत आहे. हे आत्म्यावर स्थिरावलेलं हवं. प्रथम त्यांनी कशा प्रकारचे शिष्य केले आहेत ते पहा, मग विश्वास ठेवा. तुमच्या गुरुने तुमच्या साठी काय केले आहे? तुम्हाला काही शक्त्या मिळाल्या का? तुम्हाला शांती, स्वास्थ्य मिळालं का? त्याचे शिष्य आजारी पडताहेत. दरिद्र्याने वेढलेले आहेत आणि तो स्वतः जास्तच श्रीमंत होत आहे, असा गुरु काय कामाचा? कलीयुगांत या गोष्टी होणाऱ्या होत्या.

सहजयोगांत तुमचं जीवन म्हणजे चमत्कार बनतो. सतत तुम्हाला दैवी शक्तीची मदत मिळते आणि तिला कशी हाताळायची आणि कार्यान्वित करायची ते समजतं. तुम्हाला ती मिळणे योग्य आहे. लोकांमध्ये परीवर्तन होतं. तुम्ही समजून घेणारे, नव्या परिस्थितीशी सहज सदृश्य होणारे, आत्मसात करणारे, असे होता. कितीतरी लोक महान कलाकार, गायक, वादक, लेखक, वाचस्पती झाले आहेत. तुमचं वैभवशाली व्यक्तीमत्व स्वतःचा अविष्कार दाखवूं लागतं. तुम्ही तेजस्वी आहांत पण अजून निगडीत झालेले नाही. तुम्हाला सामुहीक व्यक्ती झालं पाहीजे आपल्याकडे सत्य आहे. आणि तुम्ही त्यामध्ये नैपुण्य मिळवले पाहीजे.

"ईश्वर तुम्हाला आशिर्वाद देवो."



# महाकाली पूजा

## (बंगलोर) ९/१२/९१

म्हैसूर या राज्यावर महिषासुर राज्यकरीत होता. बंगलोर हे सुंदर हवेचं ठिकाण असलेली सुरेख स्थळ आहे. आणि राक्षस नेहमी अशा जागेमध्येच रहातात, असं तुम्हाला आढळेल. त्यांच्या शरीरामध्ये खुप उष्णता असल्यामुळे ते नेहमीच थंड असलेल्या जागा शोधण्याच्या प्रयत्न करतात.

पूर्वीच्या काळी जेव्हां देवीला राक्षसांशी सामना करावयाचा असे, तेव्हां राक्षस मानवांशी अशाप्रकारे संबंधित नव्हते. ते गुरु वगैरे होत नव्हते, आता कलीयुगांत साधकांच्या मेंदूत ते शिरले आहेत. त्यांना काढणं फार कठीण आहे. एकदा ते साधकांच्या मेंदूत गेले की भक्त बाधीत होतात. त्यांना त्रास होतो. अनेक प्रकारच्या अडचणी येतात तरीसुद्धा, ते त्या व्यक्तीला चिकटून रहातात कारण ते संमोहीत झाले असतात. हे संमोहन त्यांना अविचारी बनवितं. त्यामुळे जरी त्यांना मरावं लागलं तरी, ते गुरुला सोडीत नाहीत.

कलीयुगात अनेक साधक आहेत, जे सत्य शोधण्याचा कोणताही मार्ग शोधण्यासाठी इतस्तःत भटकत आहेत. बहुतांशी सगळे गुरु पाश्चात्य देशांत गेले आहेत, कारण तिथे लोकांकडे पैसा आहे. तरी सुद्धां तुम्ही इतके अनेकजण सहजयोगांत आला आहांत, ते तुमचं नशिब आहे. ते तुमच्या पूर्वजन्माचे आशिर्वाद आहेत ज्यामुळे तुम्ही इतके स्पष्ट पाहू शकला आणि सहजयोगामध्ये आतां तुम्ही इतके वृद्धींगत झाला आहांत आणि इतके परिपक्व झाला आहांत आणि इतर सर्व जे करताहेत ते सर्व पूर्णपणे अयोग्य आहे, हे तुम्ही जाणता आहांत.

श्री विष्णू सारख्या व्यक्तीमत्वाबरोबर खेळणं हे फार भयंकर आहे. जसं केरळात ते म्हणतात, जेव्हा श्री विष्णू मोहिनी झाले तेव्हा, त्यांना श्री. शंकरापासुन पण मूल झाले, हे ईश्वराची निंदा करणे आहे. ते फार भितीदायक दैवत आहे. ते लोक इतके मूर्ख आहेत. त्यांना समजलं पाहीजे कीं, ते जे करीत आहेत, ते चांगलं असेल तर, त्यांना रोग का व्हावेत? हे लोक फक्त एक महिना काळे कपडे घालतात, अयप्पाला जातात, उपास करतात अकरा महिने हालहाल करून घेतात. आता तो जॉगिंग वगैरे सारखा हव्यास झाला आहे.

भारतामध्ये, मुख्यत्वेकरून दक्षिणेत आपण कर्मकांडाच्या रुढीमध्ये गाडले गेलो आहांत. स्वीस मेकची घड्याळे काढणाऱ्या लोकांना आपण प्रभावित झालो आहोत. ते साधे लोक आहेत. त्यांना ते कळत नाही की, कोणत्याही अवतरणांनी या, अशा ट्रिक्स केल्या नाहीत. आणि सत्य हे परंपरेवर, शास्त्रावर आधारीत असतं. जे काही मार्गापासून विभक्त होतं, ती खरोखर ईश्वराची निंदा असते. जो आत्मसाक्षात्कार, कुंडलीनी, तुमचे उत्थान अथवा दुसरा जन्म याविषयी बालत नाही. तो गुरु असूं शकत नाही, मी रामावर विश्वास ठेवतो. तुम्ही रामावर उपकार करता काय? मी देवावर विश्वास ठेवतो, पण तुम्ही सगळं काही देवत्वाच्या विरुद्ध करीत आहांत. आता तुम्ही म्हणता मी श्री माताजींवर विश्वास ठेवतो, तर काय? काही अनुभवांमुळे तुम्ही माझ्यावर विश्वास ठेवता तरीही काय? माताजी तुमच्या आयुष्यात पाहीजेत. तुमच्या अविष्कारांत पाहीजेत, तुमच्या वागणुकीत पाहीजेत, तुमच्या इतरांबरोबरच्या वागणूकीत पाहीजेत. एकमेकांवरच्या प्रेमांत पाहीजेत. त्याच्यामुळे लोकांवर प्रभाव पडतो. लोक म्हणतात, आम्ही माताजींकडे येतो. त्यांची प्रार्थना करतो. आणि जातो. कां? कारण आम्ही माताजींवर विश्वास ठेवतो. त्या सर्व कांही करतील. त्या आपल्यासाठी भक्ती करतील कां? तुमच्या बाजूने काय येणार आहे?

एकदां ते चालू झालं की, हे सर्व राक्षस लुप्त होतील, तर मी सहजयोगासाठी काय करतो आहे? जर काही नसेल तर या साधनांचा उपयोग काय? तुम्ही प्रकाश आहांत. तुम्हाला इतरांना प्रकाशित केले पाहीजे. पण जो दिवा कुठेतर लटकत राहीला आणि कोणालाच तो प्रकाश देऊ शकणार नाही. त्याचा काय उपयोग? इतरांना साक्षात्कार देतांना अबोधितेने व परस्परपुरकरित्या द्या. असे नव्हे की, इतरांपासून फायदा व्हावा किंवा त्यांच्यावर दिमाख दाखविण्यासाठी ते करीत आहांत. आपण पूर्ण जाण ठेवून असले पाहीजे की आपण ईश्वरांच्या हातातील एक साधन आहांत आणि ते ब्रह्मचैतन्य कार्यान्वीत होत असतानां, आपल्यामधून वहात असताना, आपल्याला आनंद होतो. तुम्हाला कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही. तुम्ही भारताच्या दौऱ्याला जाता कशाला? इतरांबरोबर वाटून घ्यायला. ते जर तुम्ही शिकला नाही, तर तुमच्या अहंकार परत परत येईल.

तुम्ही हे देखील पाहीलं आहे कीं, जे लोक सहजयोग पसरवीत आहेत, ते अहंकारामध्ये बुडाले होतेच. आपण फार दक्ष राहीलं पाहीजे. जसं तुम्ही परिपक्व होता, तशी जास्त काळजी घेतली पाहीजे. झाडावर पहा, जर पान असेल तर एकही कीडा येणार नाही. जर फूल असेल तर कीडा आंत प्रवेश करून ते खाऊन टाकेल तेव्हां, जेव्हां तुम्ही फळ होत असतां त्यावेळी, तुम्हाला जास्त काळजीपूर्वक राहीले पाहीजे की, कोणताही किडा आंत येणार नाही. उलट आता तुमच्यामध्ये सर्व किटकांचा नाश करण्याची क्षमता आली आहे. आणि आपण सर्वांनी त्या स्थितीप्रत आलं पाहीजे, म्हणजे एका बाजूने तुम्ही किटकांचा नाश करीत असाल आणि दुसऱ्या बाजूने लोकांना समधान देत असाल. सामुहिकता या एकाच प्रकारे तुम्ही स्वच्छ होऊ शकता, पण सर्वात जास्त मोठी गोष्ट अशी की, सहजयोग मी कुठे पसरवूं शकेन? यासांठी सर्वतोपरी प्रयत्न करणे. मी कुठे जाऊं शकतो? जवळच्या कोणत्या खेड्यात जाऊ शकतो? मी हे कुठे कार्यान्वित करू शकतो? या गोष्टीचा तुम्ही जितका


जास्त विचार कराल तितकं चांगलं. तुम्ही जेव्हां त्या दिशेने हालचाल करूं लागाल, तर तुम्हालाच आश्चर्य वाटेल. सहजयोग तुमच्या आधी हालचाल करत असेल, तुम्हाला हवी ती लोकं भेटतील. तुम्हाला हवी असलेली सर्व मदत तुम्हाला मिळेल. तुम्हाला अचानक लोक भेटतील, जे तुमच्याकडे येतील. आणि विचारतील कीं, आम्ही तुमच्यासाठी काय करूं? तुम्ही जेव्हा तुम्हाला विस्तृत करतां तेव्हां, सर्व प्रकारची मदत तुम्हाला मिळूं लागते. पक्षी जेव्हा भरारी घेण्यासाठी पंख उभारतो तसेच आहे ते. तुम्ही जर तुम्हाला वाढविलं नाही, सहजयोग फक्त स्वतःपर्यंतच ठेवला तर, ते कार्यान्वित होत नाही. मला माहीत आहे कीं तुम्ही माझ्यावर फार प्रेम करता पण इतरांनाही ते प्रेम वाटून घ्यावं असं तुम्हाला वाटत नाही का?

जेव्हां आपण धडपड करू लागतो त्यावेळी तुम्हाला वाटत नाही का? लोकांशी सुद्धा आपल्याला झगडावं लागतं. फक्त ''माझ्याच'' च्याजवळ जाऊ नका? ''माझं'' ही फार कठीण गोष्ट आहे, तुम्हाला करायचे आहे ते हे की, पलीकडे काय आहे, ते पहायचं, जेवढे जास्त तुम्ही पलीकडे जाल, तेवढे चांगले होईल, तुम्हाला स्पष्ट दिसेल. आपण महाराष्ट्रात एवढे कष्ट केले आहेत. मला ती निरर्थक जागा वाटते. महाराष्ट्रीयन सहजयोगी फार थोडे आहेत. आणि जे आहेत ते आहेत तेही इतके चांगले नाहीत. जे जवळ आहेत, त्यांना भव्य ते दिसत नाही. जेव्हा तुम्ही मोठ्या पर्वताजवळ जाता, तेव्हा तुम्हाला तो दिसत नाही. (तुम्हाला जेव्हा कोणाबरोबर काही काम करायचं असतं तेव्हा तुमचं जवळचं नातं नाही हे पहा, किंवा तुमचं त्यांच्याशी काही संधान नाही, हे पहा. काहीतरी अनोळखी. तुम्ही ज्यांना ओळखता, ती लोकं तुम्हाला त्रास देतील.

आपली जागा उघडी आहे. जिथे कोणीही येऊ शकतं आणि त्यामुळे आपल्याला कोणत्याही प्रकारचे लोक भेटतात. सगळ्यांवर आपण मात करू शकतो. पण आपल्याला स्वतःच्या हिकमतीने पुढचं पाऊल टाकण्याची कुवत पाहीजे. तुमच्या स्वतःच्या आळशीपणावर मात केली. पाहीजे. मग ती पसरू शकेल. असं वर्तवलं गेलं आहे की, या वर्षी सहजयोग चिक्कार वाढेल. तुमच्यामध्ये शक्ती आहे. तुमच्या काबूत असलेली शक्ती ते म्हणाले, मी इथे यायच्या एक दिवस आधी फार थंड होतं. मी म्हटलं, ''काही काळजी करूं नका''. मी बंधन दिलं नाही, कांही नाही, मी नुसती इथे आले. सारं काही ठीक झालं. तशाप्रकारे ते कार्यान्वित होतं. पण तुम्हाला त्याप्रकारे समर्पित असलं पाहीजे. आता या सर्व सूर्य, चंद्र, तारे आणि सारं विश्व यांना एकच गोष्ट करायची आहे ती म्हणजे सहजयोग चांगला पसरत आहे हे पहाणे. सहजयोग स्थित होऊन त्यांचे ध्येय साध्य करीत आहे. हे पहाणे, प्रत्येक तत्व अनेक प्रकारे कार्यान्वित होत आहे. माझ्याविषयी तुम्हाला खात्री पटवून घ्यायची नाही. ती खात्री पटवून घ्यायची आहे, स्वतःविषयी. तुम्हाला ते करायचं आहे. तुम्ही माझ्या वाहिन्या आहांत, तुम्ही शक्तीच्या वाहिन्या आहांत. सुरेख डौलदार आणि समाधानकारकरित्या ते करा. तुम्हाला ते करण्याची इच्छा पाहीजे. मला तुम्हाला सांगावं लागूं नये, माझी खात्री आहे. ज्या प्रत्येक क्षेत्रात तुम्ही काम करता, प्रत्येक व्यक्तीला तुम्ही भेटता, तुम्ही सहजयोगाविषयी सांगाल, ते कार्यान्वित होतं. ते अस्तित्वात आहे. शिवाय ती तुमच्या मागेच आहे. सगळ्या देवतांची सर्व शक्ती.

स्वतःमध्ये विश्वास ठेवा, शिवाय सर्वांमध्ये विश्वास ठेवा की, ते तुम्हाला मदत करीत आहेत. गर्भगळीत होऊ नका, नुसतं पुढे जा कारण तुमच्यामध्ये शक्ती आहे. तुमच्यामध्ये शक्ती आहे. तिच्यासाठी विचारणा करा, आणि तुम्हाला ती मिळेल, पण अडखळू नका मी तुम्हाला गादीवर बसवते मी तुमच्या डोक्यावर मुकूट घालते, आणि तुम्ही राजा आहांत असे म्हणते पण तरीही तुम्ही पळून जाता माझ्यावर विश्वास न ठेवतां, माझी खात्री आहे. देवाच्या कृपेने तुम्ही ते लोक व्हाल, जे सहजयोगाचा पाया असतील आणि सहजयोगाचा महान महाल तुम्ही तुमच्या सुज्ञता, शक्ती आणि प्रेम यांनी बांधाल, आज आपण महाकाली शक्तीची पुजा करूं, जिने सर्व राक्षस व सैतानाचा विनाश केला. ही तुमची इच्छा आहे. ती कार्य करणार आहे.

''ईश्वर तुम्हाला आशिर्वाद देवो.''



# हैदराबाद पूजा सारांश

आपण हैदराबादला आलो आहोत. ज्यावर मुसलमान राजांचं राज्य होतं. पण ते सर्व अतिशय भारतीय होते. आणि भारताच्या स्वातंत्र्यासाठी त्यांनी ब्रिटीशांविरुद्ध लढा दिला. टिपू सुलतान आत्मसाक्षात्कारी होता. पण त्याला मारलं गेलं.

आपल्या देशांत एक मोठा प्रश्न आहे. आणि तो म्हणजे व्यक्तीगतरित्या आपण सर्व फार महान लोक आहोत. पण सामूहिकतेमध्ये कसं रहायचं ते आपल्याला माहीत नाही आणि त्यामुळेच आपलं स्वातंत्र्य आपण गमावलं. नीट डोळे उघडून पाहिलं तर, कोणालाही हे समजेल की, जेव्हां लोक आपल्याला मध्ये गोवून इतरांविषयी वाईट बोलू पहातात, त्यावेळी त्यांची कांहीतरी इच्छा असते. पूर्वीपासून आपण या बाबतीत उणे पडतो की, आपले लोक अशा पद्धती वापरतात, ज्यामुळे आपले नातेसंबंध बिघडतात. आणि याने सहजयोगांत शिरकाव केला आहे.

दुसरी उणेपणा असे आहे की, आपलं कुटुंब, मुलं, आईवडील, भावंड, वगैरे गोतावळ्यांत आपण फार गुरफटलो आहोत. इतक्या जवळच्या कोणीतरी आपल्याला फसविल्या शिवाय, आपण धडा शिकणार नाही. आपले सर्व प्रश्न त्यांच्या भोवती फिरत आहेत. अतिशय उच्च स्थितीमधले सहजयोगी मी पाहीले आहेत, आणि अचानक मला समजतं की, ते कोण्या एका भावाला किंवा आणखी कोणाला जो गुरुचा धंदा करतोय, त्याला जाऊन चिकटले आहेत. आपण त्यांच्यावर प्रभाव पाडण्याऐवजी ते आपल्याला प्रभाव पाडतात. तर अशा सगळ्या लोकांशी जे निगेटिव्ह आहेत. आपण खरोखर संबंध तोडले पाहीजेत. कारण इतक्या जन्मांत आपले संबंध, नाती होती त्यांच्यापासून आपल्याला काय मिळालं?

इतरांविषयी वाईट बोलणे, नाती खराब करण्यासाठी इतरांविषयी कांही वाईट बोलणे हे सहजयोगामध्ये पाप आहे. नेहमी इतरांविषयी चांगल्या गोष्टी बोला. उदा. जर कोणी येऊन मला सांगितलं कीं, अमुकअमुक व्यक्ती चांगली नाही., मी त्यांना खोटं सांगते. मी सांगते ती व्यक्ती तुमचं फार कौतुक करीत होती. त्या व्यक्तीच्या विरूद्ध या सगळ्या गोष्टी तुम्ही कां सांगता? सहजयोगाने एकीकरण निर्माण करणं जास्त महत्त्वाचं आहे, जास्त लोक आणणं, त्यांची वेगवेगळ्या पद्धतीने जोडणी करणं, जास्त सुसंगतपणा आणणं, पण लोक पॉझिटीव्ह लोकांपेक्षा निगेटिव्ह लोकांना जास्त चिकटतात. त्याचा अर्थ तुम्ही अजून पुर्णपणे सहजयोगांत नाही.

भारतामध्ये मंत्र्याने स्वतःची बायको, मुलगा, भाऊ त्यांचा नोकर देखील, त्यांची क्षमता असो किंवा नसो, पण कोणत्यातरी अधिकारपदाला चिकटवणं ही फार सर्वसामान्य गोष्ट आहे. सहजयोगांमध्ये तुम्ही असं करू शकत नाही. तुम्हाला सहजयोगी असावं लागतं. कोणी तुमचं नातेवाईक आहे, म्हणून तुम्ही त्याला घेऊन श्री माताजींना सांगू शकत नाही की, हा माझा नातेवाईक आहे, म्हणून याला मदत करा. कुटुंब जिवनाविषयक आपली कल्पना बदलली पाहीजे.

नंतर दुसरी एक चळवळ आहे तिचा तुम्ही विचार करूं लागता, तुमच्या शहराबाबत तुम्ही कुठेही जन्मला असतां पण, "श्री माताजी, तुम्ही माझ्या शहरांत या." ते महत्त्वाचं आहे. "माझे घर" माझे नातेवाईक "माझे शहर" मग "माझा देश" तर आहे तो! तुमच्या देशांतील इतर लोकांविषयी तुमची कळकळ मला समजते. पण कोणत्याही बाबतीत जिव्हाळा नको. प्रत्येकाने अलिप्त, अशा तऱ्हेने रहायला हवे कीं, स्वतःला आणि नुसतं पहायचं. स्वतःहून पहा की, तुम्ही तुमच्या स्वतःच्या देशाच्या, स्वतःच्या राजधानीच्या हितसंबंधाशी कां निगडीत आहांत? बहुतांशी, तुम्ही या जागी जन्मला, इथे वाढला, म्हणून असतं.

आपण आपल्या कुटुंबाच्या खिशांत असतो आणि इतरांकडे जात नाही. हे मूळ कारण आहे ज्यामुळे सहजयोगाचा प्रसार होत नाही. आपण आपल्या कुटुंबाच्या खिशात असतो. आणि इतरांकडे जात नाही. आपलं सर्व चित्त, वर्तणूक ही पूर्णपणे असहज गोष्टीत अडकली असते. पुर्ण विश्व आपलं कुटुंब आहे. त्यामुळे आपल्याला बाहेर उतरलं पाहीजे. जे निगेटिव्ह लोक आहेत, त्या त्यांच्या छोट्या वर्तुळामध्ये अडकून बसू नका. त्यांच्या पलीकडे, जा कारण तुमच्याकडे शक्ती आहे. तुमच्याकडे सगळं कांही आहे, तुम्ही सहज त्या बंधनांना पार करू शकता आणि पाहू शकता की आतां तुम्ही मानसिकरित्या फार आनंदी आहांत आणि अध्यात्मिकरित्या तुम्ही तिथे आहांत, जिथे असलं पाहीजे.

आपल्या भारतीय समाजात लोक संन्यास घेतात. ते कशायवस्त्र परिधान करून बाहेर जातात. अंतर्यामी संन्यास कां घेत नाहीत? वृद्धावस्था येईपर्यंत थांबण्याची काय गरज आहे? वृद्ध, जर्जर व्हायचं आणि म्हणायचं संन्यास घेतला. तुम्ही लहान असतांना ही अलीप्तता जर तुम्ही विकसित केली, तर तेव्हां तुम्ही संन्यासी असतां, तुम्ही जर फक्त सहजयोगाला चिकटून असता इतर कशालाही नाही. सहजयोगापेक्षां दुसरं काहीही तुम्हाला महत्त्वाचे नाही. ते एकदां कां तुम्ही ठरविलं, कीं तुम्ही उत्क्रांतीच्या, त्या मार्गावर जाता. समजा तुम्ही शॉर्टसर्कीट करून दुसऱ्या ठिकाणी गेला तर, ती वाढ तिथे कशी असेल? पाश्चात्य लोक स्वतःविषयीच चिंता करतात. त्यांना वाटतं की, उन्नतम ते त्यांनीच साध्य करावं. जर आपण कुटुंबामधून लक्ष काढून घेतलं की,. तुम्हाला आश्चर्य वाटेल, ते लक्ष कुटुंबाप्रत कसं जातं, आणि ते कशा तऱ्हेने विकसित होतं, तुम्हाला सर्व आशिर्वाद देतं आणि ईश्वरी प्रेमाचा सर्व

ओघ देतं.

सहजयोगांत आपण एकमेकांशी कसा व्यवहार करतो, कसे बोलतो, कशा प्रकारे रहातो, त्याचा शेवटी काय परीणाम होतो? इतरांशी आपल संभाषण जुळतं कां? तुमच्या शेजाऱ्यांना बोलवितां, तसे सहजयोग्यांना तुम्ही घरी बोलविता कां?

उजव्या आणि डाव्या बाजूचे संबंध वेगवेगळे असतात. उजव्या बाजूकडचे लोक व्यक्तीवादाचा पुरस्कार करणारे असतात. त्यांना सामुहिकता आवडत नाही. तो त्यांच्यावर लादला जाणारा दबाव असतो. उजवीकडील लोकांना सर्वात जास्त प्रश्न अहंकाराचा असतो. सहजयोगामुळे त्यांना त्याचा कैफ चढतो. कोणत्या मुद्यावर आपली चलबिचल होते? "माझं" हा दृष्टीकोन बदलला पाहीजे, जर आपण आतां अस्वस्थ असलो, तर सहजयोगांत कसे काय अस्वस्थ असू? इतरांना अस्वस्थ करू नये, यासाठी आपण पद्धतीपण शोधत नाही. बेचैन करणारा, दुसऱ्याला खाली पडणारा असा विनोदही व्यक्तीला खूप अस्वस्थ करू शकतो. कशा प्रकारची भाषा आपण बोलतो, आपला संपर्क कशा प्रकारचा असतो, कशाप्रकारे आपण इजा करतो; तुम्ही गरम माथ्याचे असू नये. तुमचा अहंकार दिसत नसेल, पण त्या अहंकाराची पद्धत प्रतीत होते.

दुसरी गोष्ट म्हणजे सतत इतरांवर टिका करीत रहाणे. हे चांगले नाही. तुम्हाला परीक्षण करायला कोणी सांगितलं आहे? तुम्ही स्वतःची पारख करतां कामा नये. त्याचवेळी इतरांचे परीक्षण करणे, त्यांना शिक्षा देणे हे तुम्ही करता कामा नये. आपल्या एक अत्यंत मधूर पातळी विकसित करायची आहे. ती तुम्हाला कार्यान्वीत केली पाहीजे. सहजयोगामध्ये आल्यानंतरही काही संवयी घुटमळत रहातात. या सवयी अत्यंत साधेपणाने व सहजतेने सुधारता येतात.

हट्टीपणा ही देखील एक भयंकर गोष्ट आहे. प्रत्येकजण या प्रकारचा सूक्ष्म हटवादीपणा बाळगून असतो, एकदां मी ठरवलं, कीं ठरवलं. बदललं तर काय भार होणार आहे? मला आनंद वाटतो, सहजयोगामध्ये कांहीही ठरविलेले किंवा नक्की असं नसतं, कार्यक्रम कधी आहे आणि कधी नाही, हे महत्त्वाचं नाही. महत्त्वाचं हे की, या बदलाबरोबर तुम्ही व्यवस्था करूं शकलां. जर तुम्हाला या बदलाबरोबर व्यवस्था करता येत नसेल, तर तुमच परीवर्तन अपूर्णच आहे.

किती माननीयतेने, कोणीतरी, तुमच्या साठी कांही केलेलं असतं. पुढच्या वेळी तुम्ही त्या व्यक्तीला भेटला कीं, ती सर्व आदरणीयता उफाळून वर येईल. कारण, तुमच्यासाठी जेव्हां कोणी काहीतरी करतं, त्यावेळी एक सुरेख संवेदना तुमच्यामध्ये येते आणि तिची जर तुम्ही आठवण ठेवली तर, तुम्ही ती वाढवित जाता.

प्रत्येकवेळी तुमच्यामध्ये मिळालेला एक प्रकारचा अनुभव तुम्ही तुमच्यामध्ये जतन करता, कोणत्याही वेळी जेव्हा तुमच्या स्मृतीने ती जागा तुम्ही उघडतां त्यावेळी त्याचं सौंदर्य, त्या संवेदनांचं माधुर्य, तुमच्यावर ओघळू लागतं.

आपल्याला आनंदी ठेवण्याच्या नव्या प्रणाली आपल्याला शोधायच्या आहेत. यापूर्वी इतरांना दुखावलं अथवा टोमणे मारले, मर्मभेदी बोलले, की आपल्याला आनंद वाटायचा. "मी काय करतो आहे? मी हे असे कां करतो आहे? इतरांना कठोर शब्द बोलून किंवा खट्याळपणा करून मी आनंदी होतो कां? हा अहंकार मला दुःखी करतो. त्याने माझा मूडच खराब केला." त्याला खाली उतरायला सांगा, मग तो खाली पडेल, एक छोटीशी हालचाल सुद्धा पूर्ण वातवरण बदलते. प्रत्येकाला कशाप्रकारे वागायचं आणि कशाप्रकारे संवेदना निर्माण करायच्या याबद्दल प्रत्येकाला अतिशय दक्ष व लक्षपूर्वक राहीलं पाहीजे. सहजयोगाच्या समाजांत आपल्याकडे सुरेख लोक आहेत. आपण हसतो, मजा करतो, आणि अत्यंत आनंददायक मेळाव्यात सतत असतो, या आनंदात आपल्याला जे कांही मिळतं ते उच्चतम असतं. कोणत्याही प्रकारचा द्वेष, खोटा गर्व, कोणतेही निर्बंध यांत सहजयोग विश्वास ठेवत नाही. मानवतेची पवित्र संवेदना यावरच त्याचा विश्वास आहे. सहजयोगाचं महान कार्य ममतापूर्वक आणि चांगलं होण्यामध्ये तुम्हाला अतिव आनंद मिळतो.

या इतर सवयी कमी करण्यासाठी, तुम्हाला थोडी संवय करून अंतर्मुख व्हायला पाहीजे. तुम्ही जेव्हां बाहेर जाल त्यावेळी, तुम्हाला खूप नवीन लोक भेटतील नंतर कदाचित तुम्हाला अशाही अडचणी येतील की, असे लोक भेटतील ज्यांच्याशी तुम्हाला कठोर व्हावं लागेल तुम्ही फार काटेकोर असाल किंवा जास्त आक्रमक असाल तर या सर्व गोष्टी त्यांना अस्वस्थ करतील. पण जर तुम्ही शांत, सहनशील, क्षमाशील असाल तर त्यांना नक्कीच, वाटेल की तुम्ही संत आहांत, जर ते तुम्हाला वाटत कठीण असतील तर त्यांना एकट्यालाच सोडा. वादविवाद करून तुम्ही त्यांना आत्मसाक्षात्कार देऊं शकत नाही. जर त्यांच्याकडे सुज्ञता नसेल, तर त्यांची तो घेण्याची त्यांची पात्रता नाही, त्यांच्या नशिबांत तसे होणे नाही. पण तुमची पद्धत अशी हवी की, त्यांना समजलं पाहीजे की तुम्ही संत आहांत, पुर्ण आत्मसन्मानाने पुर्ण प्रेमाने तुम्ही त्यांच्याशी बोललं पाहीजे, सहजयोग कसा पसरवायाचा, त्याचे मार्ग व पद्धती तुम्हाला शोधल्या पाहीजेत.

"ईश्वर तुम्हाला आशिर्वाद देवो."

# गणेश पूजा

## शेरे १५.१२.९१

### श्री माताजींच्या मराठी भाषणांचा सारांश

महाराष्ट्रांत श्री गणेशांची आराधना फार महत्त्वाची आहे. अष्टविनायकांनी वेढलेली ही भूमी आहे. तीन पर्वतांनी केलेल्या त्रिकोणाकृतीमध्ये कुंडलिनीप्रमाणे महाराष्ट्र वसला आहे. या भागात विश्वाची कुंडलीनी वसते. गणेशाचं फार महत्त्वाचं कार्य आपल्या शरीरांत होतं. म्हणजे मन, बुद्धी, शरीर सगळ्यांवर ताबा, त्याचं विशेष दान सुबुद्धीचं. सुबुद्धी मागून मिळत नाही. सूज्ञता ही अंगात बाणायला पाहीजे. ती बाणायची कशी? तर वर्तमान काळांत रहायला शिकलं पाहीजे. आता मी पुजेला बसले तर, सूज्ञता काय की, मी पुजेला बसले आहे. याचवेळी आपण विचार केला पुढचा, की, बस मिळेल, कां नाही. जेवायला मिळेल का, हे विचार केले तर, पूजा तुम्हाला लाभणार नाही. भूतकाळाचा विचार केला तर घोटाळा होणार. हे बाणण्याची एक पद्धत आहे. प्रत्येक वेळी आपण कुठेही असतो तरी, वर्तमान काळात की भुतकाळांत आहोत ते पाहीले पाहीजे. कारण भूतकाळ हा संपलेला आहे. सुज्ञतेमध्ये अनेक गोष्टी आहेत. सुबुद्धी, दक्षता, समयसूचकता असे अनेक. पण ते सगळे एका गोष्टीने सहजसाध्य होतात जर आपण वर्तमानांत रहाण्याची काही व्यवस्था केली तर.

शिवाजी महाराज झाले. ते फार मोठे होऊन गेले. आपण त्यांना मानतो. पण त्यांना आपल्यामध्ये, या वर्तमान काळांत, शिवाजीमहाराजांचे कोणते गुण आहेत. दारू प्यायचे का? कसे वागायचे? महात्मा गांधी झाले. आपल्या देशांत फार मोठी मोठी कमळं होऊन गेली. पण डबकं आहे ना अजुन? डबकंच आहे! तेव्हां आपण कुठे आहोत, ते पाहीलं पाहीजे. ही पहाण्याची सुबुद्धी जोपर्यंत येत नाही तोपर्यंत गणेश तुमच्यात कार्य करीत नाही.

गणपतीचं एक लक्षण सांगितलं आहे की, तो तुम्हाला सूज्ञता देतो. ती कुठे दिसते कां तुम्हाला? त्या गणपतीसमोरच बसून भांडतात लोक, पैसे खातात, हे करतात, ते करतात, सुबुद्धी नाहीच तिथे. मग गणपती आहे कुठे? समयसूचकता असणाऱ्या माणसाच्या स्थितीत एकदम अंतर येणार आहे. हे करून बघा तुम्ही, आणि वर्तमान काळांतच तुमची वाढ होणार आहे. आता फूल आहे. फुलाची वाढ भविष्यांत होते की भूतकाळांत? आतां, या वेळेला, होईल. ना? आपली प्रगती एवढ्यासाठीच होत नाही कारण, आपला पुढच्या गोष्टीचा विचार करतो, किंवा मागच्या. पण सद्यकालीन विचार करीत नाही. सद्यकालीन आपली स्थिती पाहीली पाहीजे, तर जे काही आहेत ते, सर्व प्रश्न सुटतील ग्रामीण प्रश्न सुटतील. आपण समजा पेरायचे आहे, तुम्ही म्हणाल, मागच्या वेळेला पेरलं होतं, असं झालं, तस झालं करत बसाल तर, गेले. परवा पेरीन तरीही गेले. आतां, आजच ते पेरायचं. ते केलं पाहीजे.

भारतात टूम आहे. गेल्याचे फार पोवाडे गातात. सहजयोगात फारच आहे. 'माताजींनी आम्हाला जागृती दिली. मग? पुढे काय? बसलो आहोत आम्ही. आता दुसरे धंदे करायचे. 'आज, आता, मला काय करायचं त्यांच्यासाठी? असा विचार केला तर, तत्क्षणी तुम्हाला फायदा होणार आहे. त्यांचा प्रत्येक क्षणाला, 'मला जागृती झाली आहे. असे लक्षांत रहात नाही लोकांच्या. मग ते तसेच रहातं. परमात्म्याच्या प्रकाश तुमच्यामध्ये आला नव्हता, त्यावेळची गोष्ट, ती कशी चालवायची आता? ते संस्कार गेले पाहीजेत.

धर्मभोळेपणा सुद्धां आपण आता सोडला पाहीजे. आणि तो कसा सुटणार? कारण, चुकीचाच शिकलात तुम्ही धर्म! कारण, तुम्ही धर्म विकत घ्यायला निघाले, आणि विकणारेही आहेत! धर्म विकत घेतां येत नाही. म्हणजे ह्या तिन्ही गोष्टी चुकलेल्या आहेत. सद्यस्थितीमध्ये तुम्हाला आत्मसाक्षात्कार मिळाला आहे. आता आत्म्याच्या बळावर काय करायचं. ते करायचं. कशाला देतां त्या देवाला? तो देव आहे कां? कोणीही दगड मांडायचा, तो काय देव आहे कां? नाहीतर म्हणतील, 'माताजी, आम्ही रामाला मानतो'' असे. आतां, राम नाहीय, मी आहे. माझे ऐका. रामाला कशाला मानायचं? तर राम खिशांत घालतां येतो, राम कांही येऊन विचारणार नाही. पण माझे भक्त झाले तर विचारीन ना, मी. म्हणून घाबरायचं! नको, माताजींची भक्ती नको! कारण, माताजी आता जिवंत आहेत नं! जिवंत असेपर्यंत मानायचं नाही. कारण जिवंत माणस विचारतात ना. फैलावर घेतात ते, 'कां बाबा, तूं असा वागलास?'' बरं, हे ग्रामीण भागातलं जे कांही आहे, जुनाट पद्धतीचं, त्यातलं किती सत्य, किती असत्य, ते तुम्हाला सहजयोगांत येऊन कळेल.

हे सुटलं तर, दुसरे आहे की आतां, ''आम्ही मॉडर्न झालो. म्हणजे काय? डोक्याला आम्ही तेल लावणार नाही. गणपतीसमोर जाऊन चावटडी गाणी गायची. वाद्यात गाणी गायची, 'आम्ही देवाला मानत नाही', म्हणायचं. म्हणजे एक त्याने गेले. एक ह्याने. याला कारण काय? आजकाल मुलं बघतात, हे आपले आईवडील, वेड्यासारखे चालले आपले. ''हरी हरी'' टाळ कुटत. जन्मानुजन्म हे केलं, पण काय मिळालं यांना त्या वारकरी पंथात? किती मी समजावून सांगितल, त्या वाऱ्या बंद करा. ज्यासाठी वाऱ्या करीत होते ते घ्या पण समजतच नाही यांना. नशा असते, तसे चालले सगळे टाळ कुटत. तुमच्यासाठी आणलंय, सगळ्यांनी घ्या. पण ते डोक्यांतच येणार नाही अजून. पुण्यच जोडत

बसलेत. म्हणजे आजच्या परिस्थितीत काय आहे? आजच्या युगामध्ये सहजयोग हा धर्म आहे. हा धर्म आम्ही स्विकारला पाहिजे. या धर्मात उतरून स्वतःला स्वच्छ बनवून घेतलं पाहिजे. सर्व धर्माचा जो काही अर्क असतो, तो म्हणजे सहजयोग आहे. आम्ही सर्व धर्मांना मानतो. कारण एका धर्माला मानलं म्हणजे काय? मी फार चांगला तू वाईट, मग झालं! आली भांडणं! पण धर्मांमधला चांगुलपणा तुम्ही शिकले तर, भांडणच होणार नाही.

म्हणजे सहजयोग सुरू तरी कुठे करायचा? चार माणसं अशी मिळणार नाहीत, जी बसून समजतील, या गोष्टींना. म्हणून मी म्हणते आपल्या मुलांना तरी आतां जपा. संभाळा, त्यांना सांगा कीं, तूं मागची पुढची चिंता न करतां, आजची चिंता कर. म्हणजे समृद्धी येईल. पुढची गोष्टी म्हणजे, नुसते मनाचे मनोरे बांधायचे, हे ही बरोबर नाही. आणि मागची गोष्ट म्हणजे, तुम्हाला जखडून ठेवलंय, तेही बरोबर नाही. मध्यमार्गात आले पाहिजे. संतुलनांत आलं पाहिजे, संतुलनांत याल, तेव्हा बघाल तुमच्यांत केवढ्या शक्त्या येतात आणि तुम्ही काय काम करू शकता.

महाराष्ट्र म्हणजे चैतन्याचा नुसता पुतळा आहे. कारण विश्वाची कुंडलिनी इथे आहे. महाराष्ट्रीयन लोकांना समजावून मी थकले. ह्यांच्या लक्षांतच येत नाही. अजून, मी लंडनला असते. तर, महाराष्ट्रातल्या माणसाचं पत्र. 'हा माणूस असा, तो माणूस तसा." कान किटले. नी डोळे मिटले, ते संपतच नाही. दुसऱ्याचं चांगलं दिसतच नाही. म्हणे सहजयोगी आहेत, ते लोक सगळे! आश्चर्याची गोष्ट आहे!!

तर, त्या साधुसंतांना काय वाटणार आहे? त्यांचं कार्य पुढे नेण्यासाठी आम्ही आलो. महाराष्ट्रांत जन्म घेतला. मराठी भाषा आम्हाला येते. सगळं काही असूनही, लोकांना कळत नाही.

आज श्री गणेशाला स्मरून निश्चय करायचा की, आम्ही वर्तमान काळांत राहू. माझ्या बोलण्याचं वाईट वाटून घ्यायचं नाही. मी आई आहे. जे खरं, ते सांगीतलं. हे लक्षात घ्यावं. मुलाबाळांची दैना होतेय, ते बघायला पाहिजे. त्याकडे लक्ष द्यायला पाहिजे.

सगळ्यांना अनंत आशिर्वाद.

# कळवे पूजा
## ३१/१२/९१

श्री गणेशांची आराधना करणे फार महत्त्वाचे आहे. छायचित्रातुन वगैरे तुम्हाला कळले आहे कीं, ते जागृत दैवत आहेत. ते मुलाधारावर आहेत, जरी खरं पाहीलं तर, ते सर्व चक्रांवर बसले आहेत. त्यांच्याशिवाय कांहीही कार्यान्वीत होत नाही. कारण ते म्हणजेच, पावित्र्य आहे. कुंडलीनी जिथे जाते, तिथे तेच आहेत, जे पावित्र्य ओततात. आणि त्यांची स्वच्छता करण्याची शक्ती ही तुमच्या चक्रांना स्वच्छ करते. श्री गणेशांचे सद्‌गुण जाणणं, हे फार महत्त्वाचं आहे. त्याशिवाय कशाप्रकारे ते तुमच्या चक्रांमध्ये कार्य करतात, आणि कशाप्रकारे तुम्हाला मदत करतात, ते देखील. त्यांची नुसती महान शुद्धता, पावित्र्य आणि समयोचित सूज्ञता यांसाठी उपासना करतां कामा नये, तर आपल्याला हे समजावून घेतलं पाहीजे कीं, सूज्ञता "विझ्डम" हे काहीतरी मनावर बिंबवता येईल, असं नाही. त्याला युक्तीने, डावपेच आखून मिळवितां येत नाही ते काहीतरी, ते फार अंतर्यामीचं आहे. आपल्या परीपक्वतेमधून ते येत असतं. आणि ही योग्य परीपक्वता, तुमच्या कुंडलिनीवरचं तुमचं योग्य लक्ष, तुमची कुंडलीनी ब्रम्हचैतन्याशी संधान साधून ठेवणे यांच्यामधून येते. ते कर्मकांड नव्हे. पण जेव्हां तुम्हाला ते करावस वाटतं. त्यावेळी ते केलं पाहीजे. आणि कांही वेळाने तुम्हाला समजेल की तुम्ही सतत ध्यानात आहांत.

ते लहान बालक आहे. आणि चिरंतन बालक आहे त्यामुळे त्यांना बालकांची अबोधिता मिळते. ज्यावेळी कुंडलीनी उत्थान पावून आपल्या चक्रांना आशिर्वादीत करते. आपोआप आपल्याला वाटू लागते कीं, आपली अबोधिता परत आली आहे. आपल्याकडे अबोध हृदय, अबोध मन आणि अबोधित प्रेम आहे. साधं, अबोधित व्यक्तीमत्व ही सहजयोग्याची खूण आहे. ज्याला हे सुद्धा माहीत असतं, की श्री गणेशाचे गण त्याची काळजी घेत आहेत. हे गण सतत तुमची काळजी घेत असतात. पण त्याशिवाय त्यांचं तुमच्यावर पूर्ण लक्ष असतं. तुमच्या वागण्यावर पूर्ण लक्ष असतं. तुम्ही सहजयोगाचा फायदा घेऊं पहाल तर, ते तुम्हाला शिक्षा करू शकतात. ते तुमच्या विरोधांत कार्य करू शकतात. मी तुम्हाला अनेकदां सूचना दिली आहे. तुमच्या फायद्यासाठी सहजयोगाचा अयोग्य फायदा घेऊ नका. तो इतरांच्या हितासाठी आहे.

अनेक लोक आहेत, जे सत्याला शोधत आहेत. कोण सत्याला शोधत आहेत, ते तुम्ही ओळखून काढले पाहीजे. आणि त्यांना शोधल्यावर त्यांच्या बरोबर वादविवाद घालू नका. नुसतं त्यांना आत्मसाक्षात्कार द्या. त्यांना व्हायब्रेशन समजूं द्या. तर गोष्टी चांगल्या घडतील. या जगांत अनेक असत्य गोष्टी आहेत. हरकत नाही. हे सारं असत्य सत्याने सहज स्वच्छ केले जाईल.

"ईश्वर तुम्हाला आशिर्वाद देवो".

# महालक्ष्मी पूजा (कोल्हापूर)
## दि. २१/१२/९१

आपण जेव्हा भारतामधील दैन्य पहातो, तेव्हां उद्विग्न होऊन जातो. या सर्व लोकांना सुद्धां जेव्हां देवाचे आशिर्वाद मिळतील, तेव्हां सारं ठीक होईल. देवत्व महालक्ष्मीमधून कार्यान्वीत होतं. तुमचं लक्ष्मीतत्व जिथे समाधान पावतं, त्या बिंदूपर्यंत तुम्हाला पोहोचलं पाहीजे. आणि त्यानंतरच तुम्ही साधना सुरू करता. ती साधना महालक्ष्मी तत्वामधून येते. सहजयोग मध्यमार्गातून वृद्धींगत होतो, अतिशय श्रीमंत लोक सहज योगामध्ये फार कमी येतात. जर ते आले तर ते त्याचा फायदा घेतील आणि त्याची गहनता जाणणार नाहीत. त्याचप्रकारे गरीबही. हे एका नदीचे दोन काठ आहेत. जर आपण विस्तृत्व होऊ लागलो, तर नक्कीच दोन्ही काठांवर आपण परमात्म्याचा आशिर्वादांचा पाऊस पाडू, जोपर्यंत तुम्ही सहजयोगी होत नाही, तोपर्यंत तुमची आर्थिक परिस्थिती सुधारू शकत नाही. तुमचं लक्ष्मीतत्व समाधानी होईपर्यंत तुम्ही एक सहजयोगी बनू शकत नाही.

कशाप्रकारे आपलं लक्ष्मीतत्व समाधानी होतं? जेव्हां गरजेपेक्षा जास्त पैसा आपल्याकडे असतो, त्यावेळी आपण विचार करतो या पैशाचं मी काय करू? काही लोक अशाप्रकारे विचार करतात कीं, "मी आणखी एक गाडी घेईन, आणखी एक घर घेईन, हे आणि ते. एक प्रकारची असमाधानी वृत्ती तिथे येते. आता आणखी काय? त्यानंतर कर आणि सर्व प्रकारचे प्रश्न उभे रहातात, असे कीं मग लोकांना वाटतं, हे सगळं भरपूर झालं. मला आतां आणखी नको. पैशामागे फिरणं पळून जातं. सहज योगांत तुम्ही अशाप्रकारे आशिर्वादीत होता कीं, तुम्हाला आवडणारं सर्व कांही तुम्हाला मिळू लागतं. तुमचा आत्मसाक्षात्कार तुम्ही घेतला कीं, सर्व कांही तुम्ही शॉटसर्कीट करू शकतां आणि महालक्ष्मी तत्वांत प्रवेश करू शकता, जर का तुमची परीस्थिती अशी असली की, आता आम्ही फाजील श्रीमंत झालो, तर ती श्रीमंती तुमच्या डोक्यात जाते. लक्ष्मीचं तत्व हे की, देऊन टाकणे. उदार व्हा.

दुसरं, लक्ष्मीतत्व कार्यान्वित होतं, जेव्हां तुमचं फार छान सुरेख घर असेल, लोक येतात, तिथे रहातात. तुम्ही त्यांच्याकडे लक्ष पुरविता, त्यांना जेवण देता, आणि या सर्वांचा आनंद लुटता, तर औदार्य चालू होतं. पण ते औदार्य सुद्धा जास्त समाधानकारक नसतं. ते लोक जीवनातील सत्य जाणण्याचा विचार करू लागतात.

एकदा किल्ला बांधणीचं काम चालू असतांना शिवाजीने पाहीलं आणि त्यांच्या मनात विचार आला" मी अनेक गोरगरीबांना कितीतरी काम दिलं आहे" अचानक त्यांचे गुरू रामदास स्वामी तिथे आले आणि म्हणाले, "ती शीळा आणा आणि हळूच तोडा" शेवटी ते नारळासारख्या असणाऱ्या दगडापर्यंत आले, रामदास स्वामींनी तो दगड हातात घेतला आणि हळूच तोडला. त्यात पाणी होतं आणि त्यामध्ये बेडूक होता. तेव्हां शिवाजीने जाणलं कीं जेव्हां देव तुम्हाला जन्म देतो, तेव्हां तुमच्या पालनपोषणाची व्यवस्थाही करतो. तुम्ही दुसऱ्यांसाठी इतकं करता याविषयी तुम्हाला गर्व असू नये. जेव्हा तुम्ही सामाजिक कार्य वगैरे करता, तेव्हा तुम्हाला एक प्रकारचा अहंकार विकसित होतो. त्या अहंकाराचे लाड करायला जर लोकांनी तुम्हाला नोबेल पारीतोषिक वगैरे दिलं तर त्याप्रकारचं औदार्य आणखी घातक असू शकतं, त्यामुळे एक प्रकारची भावना निर्माण होते कीं, तुम्ही खूप महान आहांत आणि फार महान कार्य करीत आहांत.

मग आपण कंजूष लोकांकडे येतो. तो रोग आहे. कधी कधी पूर्ण देश कंजूष प्रकारचा असतो. ते पैशाबाबत बोलतात आणि त्याबाबतीत काहीही सभ्यता नसते. अनेक देश जे फार श्रीमंत समजले जातात ते नुसतेच कंजूष नव्हे तर असभ्यही आहेत. एकदा आम्ही उपहारगृहात व काही लोकांबरोबर रात्रीचे जेवण जेवलो. जेवणानंतर बरचसं अन्न उरलं होतं आणि त्यांनी ते वेटरला बांधून द्यायला सांगितलं कारण त्यांनी त्याचे पैसे दिले होते. तिथे काहीच लाजलज्जा, सभ्यता, रुची नाही. श्रीमंत असण्याचा हा सर्वात मोठा शाप आहे. लोकपूर्णपणे निर्लज्ज असभ्य, उर्मट आणि सर्वात अधिक म्हणजे, अधर्मिक होतात. ज्या गोष्टी खूप मायावी असतात आणि साध्य करायला फार कठीण वाटतात. पण मानवाला इतकं भयानक बनवितात, त्या गोष्टींबद्दल आपल्याला भिऊन असलं पाहीजे. त्यांना कोणत्याही प्रकारच्या कांहीही मर्यादा नसतात. आणि दुसरे काय म्हणणार किंवा त्यांनी कसं असल पाहीजे, याची ते अजिबात पर्वा करत नाहीत. अशी श्रीमंत राष्ट्रे डावीकडून उजवीकडे आणि उजवीकडून डावीकडे यो यो सारखी फिरत असतात.

श्रीमंत माणसामध्ये ज्या प्रकारचा अहंकार येतो तो खरोखर मूर्खपणाचा असतो, मोत्यांच्या चपला करणाऱ्या राजाप्रमाणे. अत्यंत हिडीसप्रकारे जे लोक आपल्या श्रीमंतीचं प्रदर्शन करू पहातात ते लोक संस्कृतीचे मारेकरी असतात. दुसरी गोष्ट, ज्यात ते गुंततात ती म्हणजे, नितिमत्तेचा पुर्णपणे अभाव. त्यांना वीस वर्षाची मुलगी किंवा ऐंशी वर्षाची स्त्री सारखीच असते त्यांना प्रमाणबद्धतेची संवेदनाच नसते अशा हलक्या प्रतीचं आयुष्य ते जगतात. जे नुसतं मानवाहून कमी प्रतीचं नसतं, तर प्राण्यांहून हलक्या प्रतीचं असते.

देव तुम्हाला आशिर्वाद देवो.

# ख्रिसमस पूजा

## गणपतीपुळे, दि. २४.१२.९१

### श्री माताजींचे भाषण (सारांश)

आताचा योग हा फार महत्त्वाचा आहे आजच्या महत्त्वाच्या दिवसाला अंगारकी चतुर्थी किंवा कृष्ण पक्षाची चतुर्थी असं म्हणतात. प्रत्येक चतुर्थी श्रीगणेशाचा जन्मदिन म्हणून साजरी केली जाते. महिन्याचा चौथ्या दिवशी चतुर्थी येते. पण जर चतुर्थी मंगळवारी आली, तर तो दिवस फार महत्त्वाचा समजला जातो. आज तोच दिवस आहे आणि आपण सारे इथे गणपती पुळ्याला, मंगळवारी, अंगारकी चतुर्थीच्या दिवशी जमलो आहोत. श्री गणेशांची पुजा करण्यासांठी हजारो लोक इथे येतात.

सहजयोगीयांनी हे जाणले पाहिजे की, जे कांही होत आहे, ते सोशिकतेने घेतले पाहिजे. "सबुरी". जर तुम्ही घाईगर्दी करण्याचा प्रयत्न केला किंवा हताश झाला, घायकुतीला आला, तर काहीच केलं जात नाही. सबूरी मूळे तुम्हाला ताबडतोब कळतं की, काय केलं पाहिजे आणि कशा प्रकारे केलं पाहिजे. घाई हा "असहज" मार्ग आहे, श्री साईनाथांनी सांगितलं की सोशिकता राखा, सहनशिलतेमध्ये दिव्यत्व आढळतं, सापडतं. जेव्हा एखादं संभाषण चालू असतं त्यावेळी नुसतं थांबा आणि पहा. जेव्हा तुम्ही या स्थितीला येतां त्यावेळी परमचैतन्य सर्व कांही कार्य करतं आणि तुम्ही नक्की काय करायचं आहे, ते तुम्हाला कळतं.

श्री. गणेशाचं वैशिष्ट्य म्हणजे त्यांची नम्रता आणि त्यांची विद्वत्ता हे आहे. हे दोन्ही गणेश तत्वांतून येतं. दुसरं वैशिष्ट्य म्हणजे, ते फार शांत, शीतल व्यक्ति आहेत. त्यांची चालण्याची ढब सुद्धा शांत, एखाद्या हत्तीप्रमाणे आहे. अगदी सावकाश एखादी स्त्री सुरेखरित्या चालते तेव्हां तिला "गजगमिनी" असे म्हणतात. हत्ती फक्त गवत खातात पण ते खूप शक्तिमान असतात. आणि जिथे भारी वजनाचं काम असेल तिथे ते वजन हलविण्यासाठी त्यांचा वापर होतो. हत्तीदेखील खुप शांत स्वभावाचे असतात कोणत्याही गोष्टीसाठी ते घाई करीत नाहीत. त्यांची स्मरणशक्ति देखील प्रचंड असते. जेव्हा तुमची डावी बाजु कमकुवत होते, तेव्हा तुमची स्मरणशक्ति अस्पष्ट होऊ लागते, याचं कारण तुमच्या मधलं गणेशतत्व कमी झालं असतं. जेव्हां तुम्ही अतिशय उजवीकडचे होता, त्यावेळी डावी बाजु कमी होत जाते. जे लोक फार जास्त काम करतात त्यांची स्मरणशक्ती उतार वयांत कमी होत जाते. श्री गणेशाविषयी वैशिष्ट्यपूर्ण गोष्टी ही कीं, त्यांच्या विद्वत्तेच्या जोडीने त्यांची स्मरणशक्ति देखील खूप तल्लख असते. त्यांना सर्व काही आठवतं. त्यांना सर्व गोष्टींचं स्मरण ठेवावं लागतं कारण कुंडलिनीवर सर्व कर्माचा ठसा उठविण्याचं काम श्री गणेशच करतात. त्यांच्या उजव्या हातांत लेखणी असते. ती म्हणजे त्यांचा स्वतःचा दातच आहे. आणि तुमच्याबद्दलचं सर्व काहीते लिहीतात, तुम्ही काय केलं, तुमच्या अडचणी काय, साधक म्हणून तुम्ही कुठे गेला, काय चुका केल्या, जेव्हा कुंडलिनी उत्थान पावते त्यावेळी तुमच्या चक्रांवर कांही बाधा दिसून येतात का, तुम्हाला जाणवतात कां? आणि त्या चक्राविषयी काय बरोबर नाही. या प्रकारे ते पुरेपूर शास्त्रीय आहे. गणेशतत्त्वाचा फक्त हाच गुण नाही की, व्यक्ति पवित्र आणि अबोधितेत असावी, त्यांचे अनेक गुण आहेत. जसे तुम्हाला सूज्ञता आणि बुद्धीमत्ता असायला हवी, योग्य आणि अयोग्य तुम्हाला समजले पाहिजे.

अंगारिका म्हणजे काय? जळते निखारे श्री गणेश थंड करतात कुंडलिनीसुद्धा फक्त एक ज्वाला आहे. तिची हालचाल जळणाऱ्या आगीप्रमाणे असते. धरतीला गुरुत्वाकर्षण असते. वर जाणारे सर्व कांही जमिनीकडे खेचले जाते. फक्त अग्नि गुरुत्वाकर्षणाविरुद्ध वर खेचला जातो. तुमच्यामधील अग्निला श्रीगणेश दोन प्रकारे शांत करतात ते कुंडलिनीला शांत करतात, त्या व्यक्तिमध्ये दोष असले तरीही त्या व्यक्तिला आत्मसाक्षात्कार देण्याची ते कुंडलिनीला विनंती करतात. ते कुंडलिनीचे बालक आहेत. आणि तुमच्यामध्ये ते आहेत. ते बालक आहेत त्या नात्याने ते कुंडलिनीची समजूत घालतात की, तुम्ही माता आहांत, आणि माझ्या इच्छामध्ये मला सहाय्य करा. मग ती शांत होते आणि विचार करते कीं, माझ्या मुलाला ते हवं आहे, तेव्हा मी उत्थान पावेन.

एकदां देवी अतिशय संतापली, सर्व जगाचा विनाश करावा असा तिने विचार केला. लोक चुकीच्या मार्गाने जाऊन अनेक पापे करीत आहेत, तेव्हां तिने निर्माण केलेल्या निर्मितीला कांहीच अर्थ नाही असं तिला वाटलं, तेव्हा ती विनाशाचे नृत्य करू लागती, हे पाहून श्री शिव फार काळजीत पडले, आणि सर्व जगाचा नाश होईल असं त्यांना वाटू लागलं. त्यामुळे त्यांनी श्री कार्तिकेय यांना, जे तिचं स्वतःचं मूल होतं, त्यांना तिच्या पायाशी ठेवलं. तशाच प्रकारे श्रीगणेश कुंडलिनीला शांत करतात. हे सांगून की, तुझ्या मुलांना तूं जन्म देत आहेस, आणि अशा वेळी तूं रागावलेली असतां नये. कांही लोक जे अयोग्य गुरुंकडे गेले आहेत, त्यांनी सुद्धां कुंडलिनीला खूप त्रास दिला आहे. कुंडलिनीचा हा आधार देखील श्री गणेशच आहेत. कुंडलिनी फक्त त्यांच्या शक्तिनेच उत्थान पावते. कुंडलिनीतून निघणाऱ्या ज्वाला, शीतल ज्वाला असतात. तुमचा राग आणि चिडचिडही ते थंड करतात, जेव्हां आपल्याला राग येतो, तेव्हां आपण त्या तारेत वहावतो आणि आपण काय करावयाचे

आहे, हे आपल्या ध्यानांत येत नाही. त्या मनःस्थितीत आपण कोणाला तरी मारू शकतो किंवा कोणाचा खून करू शकतो. त्यावेळी श्रीगणेश त्याला काबूंत आणतात. आणि तुमची मनःस्थिती थंड करतात.

ख्रिस्त देखील श्री. गणेशासारखे आहेत. सर्वांना क्षमा करा असे त्यांनी सांगितले. ज्यांनी त्यांचे हालहाल केले आणि ज्यांनी त्यांना सुळावर चढविले, त्यांना त्यांनी क्षमा केली. त्यांनी म्हटले, 'हे देवा त्यांना क्षमा कर. कारण, ते काय करीत आहेत ते त्यांना माहीत नाही, जेव्हां लोक परीधान करण्याच्या वस्तु आणि देवाच्या दानाचा देवाच्या नावाने व्यापार करू लागले, तेव्हां त्यांनी हातात चाबूक घेतला व त्यांना फोडून काढले ही त्यांची दुसरी बाजू होती, जेव्हां एखादा राक्षस किंवा दुष्ट प्रकृतीची व्यक्ती तुम्हाला त्रास देते, त्यावेळी, ते "गणपती" गणांचे अधिपती असल्याने ते त्यांचा नाश करतात. तुम्हाला काहीही करावे किंवा सांगावे लागत नाही. हे गण तुमच्या बरोबर असतात, जेव्हां ते तुम्हाला वाचवितात, तेव्हां तुम्हाला तो चमत्कार वाटतो, जर ते तुमचं रक्षण करीत असतील. तर तुम्ही जाणून घ्या की, तुम्ही सहजयोगी आहांत.

दुसरी गोष्ट म्हणजे आपल्या शरीरांत सुद्धा ते नेहमी कार्यरत असतात. जेव्हां तुम्हाला तुमचा आत्मसाक्षात्कार. मिळतो तेव्हां, तुमचं ईश्वराशी संधान जुळतं, आणि ते तुमची काळजी घेतात. तुमची नोकरी, मुलं यांचीदेखील. आत्मसाक्षात्काराआधी 'अँटिबॉडी' स्वरूपात ते आपल्यामध्ये असतात, जे रोगांपासून आपला बचाव करतात. हे मध्य हृदयामध्ये असतात आणि बाराव्या वर्षापर्यंत 'स्टर्नम' या अस्थिमधे ते तयार होतात. जेव्हा एखादे संकट आपल्यावर येतं स्टर्नम हलतं आणि ताबडतोब येऊ घातलेल्या घातुक रोग किंवा व्हायरसशी लढा देणं ते चालू करतात. जेव्हां तुम्ही श्री माताजींच्या विरोधात जाता त्यावेळी तुम्ही अनैतिक बनता. ज्यावेळी तुम्ही देवाच्या विरोधांत जाता तेव्हां आळशी आणि अकार्यक्षम नालायक बनता. लोकांनी स्वतःची नितीमत्ता गमावली आहे, त्यांची चक्रे खूप कमकुवत होतात आणि दुरूस्त करण्यास कठीण अशी होतात. 'त्यांना "एडस" आणि इतर विघातक रोग होऊ शकतात आणि त्यासाठीच आपण आपले सर्व आयुष्य पवित्रतेमध्ये बुडविले पाहीजे. ख्रिस्त या पवित्रतेसंबंधी बोलले होते. तुम्ही दृष्टी निरंजन हवी, असे ते म्हणाले. कारण त्यांचे स्थान आज्ञाचक्रावर आहे. जर डोळे पवित्र नसतील, तर ख्रिस्त तिथे नसतील. पाश्चात्य लोक ख्रिस्तावर विश्वास ठेवतात, पण त्यांची दृष्टी फार वाईट असते. त्याचे डोळे सारखे भिरभिरते असतात. स्त्रियांकडे बघत किंवा स्त्रिया पुरुषांकडे बघत असतात. त्यांचे डोळे कधीच स्थिर नसतात. ही निगेटीव्हिटी आहे.

श्री गणेश प्रत्येक चक्रावर आहेत. ते प्रत्येक चक्रावर बसणारे उपकुलगुरु आहेत. त्यांनी तसे म्हटल्याशिवाय कुंडलीनी उत्थान पावत नाही. त्यांचा दुसरा स्वभाव निखाऱ्यासारखा आहे. अंगार" फक्त ज्योतच ज्योतीला थंड करू शकते. जेव्हा रावण श्रीरामाच्या विरूद्ध बोलला त्यावेळी पुर्ण लंका जळून गेली. कारण श्री हनुमानसुद्धां मंगळवारी जन्मले. आणि श्रीगणेश व श्री हनुमान दोघे मिळून एकत्र त्यांचं कार्य करतात. मुख्यत्वे करून मानवामधील राग काबूंत आणण्याचं काम करतांना ते अशाप्रकारे क्लृप्त्या लढवितात की, त्या व्यक्तीला आपण चूक करतो आहे हे कळतं. उष्ण प्रकृतीच्या लोकांना सुद्धां ते ठीक करतात. जर व्यक्ती मंगळाची असेल, म्हणजे व्यक्तीचा मंगळ बरोबर नसेल, तर तशा व्यक्तीचा खडा जो देखील उष्ण असतो तो देतात. उष्ण कटिबंधातले लोक खुप गरम मिर्च्या खातात. त्यांना घाम येतो. आणि ते थंड होतात ते अशाप्रकारे तुम्हाला दर्शवितात की, तुम्हीच थंड होता. हे सर्व रोगही बरीच उष्णता निर्माण करतात, या उष्णतेने व्यक्तीचा गोंधळ होतो त्यावेळी आपण श्री गणेशाची प्रार्थना केली पाहीजे. आणि ही उष्णता काबूत आणण्यासाठी त्यांना शरण गेले पाहीजे.

जी वेळ पुजेसाठी असेल त्यावेळी पुजा चालू होईल, हे समजण्यासाठी सहनशीलता पाहीजे. जे ठरलेलं आहे ते का बदलायचं? आपण घड्याळाचे गुलाम नाही. जर तुम्ही लोक घड्याळाचे गुलाम बनला नाही तर, सहजयोग पसरु शकेल. त्यांचा अनुभव असला पाहीजे. त्यामध्ये विश्वास आपण स्वतःच्या मेंदूने आणि तुम्हास नक्कीच तुमच्यामध्ये काही चूक असते. श्री गणेश किती महान आहेत, हे तुम्ही बघता आणि या अष्टविनायकाच्यामुळेच महाराष्ट्राला इतकं सारं पुण्य मिळालं आहे.

तुम्ही खूप आशिर्वादित आणि बुद्धीवान आहांत. कारण, शोधलं आणि तुम्हाला सत्य गवसलं! हे पुर्णत्वाला नेण्यासाठी श्री गणेशाचे गुण तुम्ही स्वतःमध्ये आत्मसात केले पाहीजेत. तुम्ही पहाताय, हजारोच्या संख्येने लोक गणपतीपुळ्याला श्री गणेशांची पुजा करण्यासाठी येत आहेत. त्यापैकी किती जणांचा त्यांच्यावर खरोखर विश्वास आहे? ते दारू पितात, बायका ठेवतात, एकमेकांशी भांडतात. अत्याचार करतात आणि श्री गणेशांच्या अंगारीकेसाठी आले आहेत. जर तुमच्यामध्ये एवढा मोठा अग्नी आहे, तर तुम्ही कां आला? कोणालाही असं वाटतं नाही की, ज्यावर त्यांचा विश्वास आहे त्यांचे गुण आत्मसात करावे, तुम्ही नाहीतर ज्या दैवताची अथवा गुरुची प्रार्थना करता, पण त्याचे गुण तुम्ही आत्मसात करता कां? जोपर्यंत ते गुण तुम्ही आत्मसात करीत नाही. तोपर्यंत तुमचा त्यांच्यावरचा विश्वास हा असून नसल्यासारखा आहे.

"ईश्वर तुम्हाला आशिर्वाद देवो".

# श्री लक्ष्मी पूजा
## (अलीबाग) २९/१२/९१

निसर्ग सौंदर्याचा आस्वाद घेणं म्हणजे त्यांच्या सानिध्यात रहाणं नारळाला श्रीफळ म्हणतात कारण, नारळ म्हणजे सहस्त्रार. ही फार आश्चर्यकारक गोष्ट आहे कीं, हे फळ सारं काही जाणतं, समजावून घेतं कोणत्याही प्राण्यावर, माणसावर ते पडत नाही. फळाकडून कोणालाही इजा होत नाही. मानवप्राण्यापेक्षा ते जास्त संवेदनाक्षम आहे. सहज योगामध्ये खूपच माधुर्य, चांगुलपणा, न्यायीपणा आहे आणि तो कितीतरी उत्तेजन देणारा आहे.

नूतन वधूवरांनी एकमेकांविषयी ममताळू असावं. प्रथमच तुम्ही जर आखडून असाल, तर तुम्हाला त्याची किंमत मोजावी लागेल. कृपया इतरांशी बोलकेपणाने चांगलं, दयाळू पद्धतीने वागण्याचा प्रयत्न करा. गप्प बसून तुम्ही इतरांवर छाप पाडता असं नसतं. बोलणं फार महत्त्वाचं आहे. आणि तुमच्या भावना लपवून ठेवूं नका. जर तुमची लग्न फार उत्तम झाली, तर तुम्हाला फार चांगली मुलं होतील आणि मग या जगतात नव्या जातीची लोकं जन्माला येतील. ही मुलं आपल्यासाठी फार महत्त्वपूर्ण गोष्ट असेल, आणि आपण ज्या गोष्टी कार्यान्वित करूं शकलो नाही, त्यागोष्टी ही मुलं कार्यान्वित करतील.

इथे अलीबागला आपण समुद्रकिनाऱ्याला आहांत. आणि समुद्राच्या भावना आपण जाणल्या पाहीजेत. एक प्रकारे, सागर हे तुमचे आजोबा आहेत. कारण त्यांनी लक्ष्मीला जन्म दिला, जी नंतर महालक्ष्मी झाली, आपण त्यांना सर्व प्रकारे आदर दाखविला पाहीजे. इथे लोक स्नानगृहाचा वापर करतात, पाश्चात्य देशांत ते समुद्राचा वापर पोहोण्यासाठा करतात. विचित्र कपडे घालून उच्छृंखल जीवन व्यतीत करतात. हा सागराचा अपमान आहे. आपल्याकडे जसा वरुण आहे तसा ग्रीक तत्वज्ञानांत नेपच्यून ही समुद्रदेवता आहे. या समुद्र देवतेची पुजा केली पाहीजे. तिला जाणलं पाहीजे. तिचा आदर राखला पाहीजे. आपण अनादर करता कामा नये. समुद्रांत प्रवेश करतांना आणि बाहेर येतांना आपण त्याला नमस्कार म्हटले पाहीजेत.

समुद्रामुळे आपल्याला पाऊस मिळतो. आपल्या जीवनासाठी समुद्र किती महत्वाचा आहे! सागर म्हणजे गुरु. महागुरु जो आपल्याला अनेक गोष्टी शिकवितो प्रथमतः हा महागुरु आपल्यासाठी मीठ निर्माण करतो, खिस्ताने म्हटलं आले की, तुम्ही विश्वाचे मीठ आहांत मानवजातीला चव आणि मीठाचे सर्व गुणधर्म देणारे, ते तुम्ही आहात. समुद्राला त्याच्या स्वतःच्या मर्यादा आहेत जेव्हा त्याची भरती असते तेव्हा, तो एका बिंदूपर्यंत येतो आणि मग मागे जातो परत दुसऱ्या दिवशी तो त्या बिंदूकडे येतो. समुद्राची दुसरी गुणवत्ता म्हणजे त्याच्या आंत असलेल्या सर्व प्राण्यांची तो काळजी घेतो. तो खारट आहे, पण मासे आणि इतर जलचरांचं तिथे अस्तित्व असतं. आणि समुद्रांतच प्रथम जीवन हे अस्तित्वात आलं, आपले सर्व पुर्वज सागरांत जन्मले असतील, आणि मग आपण मनुष्यप्राणी झालो. समुद्र जिथे आपले पुर्वज अस्तित्वांत होते. त्याचा अपमान करण्याचा आपल्याला अधिकार नाही.

तिसरी गोष्ट म्हणजे तो गहन असतो. जर समुद्राची गहनता कांही फुटांनी कमी केली तर, सगळीकडेच प्रश्न उभे राहतील. ते स्वतःची गहनता टिकवून धरतात त्याचप्रकारे सहजयोगांत आपल्याला जी गहनता मिळाली आहे, ती आपण टिकवून धरली पाहीजे. सर्वसाधारणरित्या आपण एकदम हलक्या प्रतीचे होता कामा नये. आपल्याला तसं बनून चालणार नाही. आपल्याला गहन व्यक्तीमत्वाचे लोक झालं पाहीजे. स्वतःची आणि सहजयोगाची गहन जाणीव असणारे. ते माननीयतेचं लक्षण आहे. आपल्याला स्वतःची आणि सहज योगाची माननीयता हवी. सागराचं माननीय, राजेशाही स्वरूप तुमच्यामध्ये असले पाहीजे. ही झाडं यांना सगळा वारा समुद्राकडून मिळतो, पण ती समुद्राकडेच वाकतात व उलटीकडे नाही. त्याप्रकारे ते त्यांची कृतज्ञता दाखवितात, झाडांनाही समजतं. समुद्राशिवाय आपली वहातूक झाली नसती. याशिवाय समुद्रतळाशी अतोनात संपत्ती आहे. जिथे अजूनपर्यंत कसून पहाणी झाली नाही. एकदा कां तिचा पूर्ण अभ्यास झाला की सर्व जग अत्यंत समृद्ध होईल. पण समुद्राचा कोणता भाग कोणत्या देशाचा आहे, याबाबत ते भांडत आहेत. सोने, चांदी, हिरे, अशी अनेक मूल्यवान रत्ने समुद्राच्या तळाशी आहेत. कदाचित एके दिवशी ही लक्ष्मी संशोधनास सापडेल आपण लोक परत समृद्ध होऊ आणि त्याशिवाय ही लक्ष्मी आपण एका जागेहून दुसरीकडे नेऊ शकूं. वाहतूक होऊ शकेल. समुद्राने आपल्याला ते दळणवळण दिलं आहे.


समुद्राची माझ्याबरोबर खूप प्रतिक्रिया असते, हे मी पाहीलं आहे. जर उजेड असला, तर चंद्राचं प्रतिबिंब सागरांत पडलेलं असलं, तर ते माझ्या बरोबर हलतं. समुद्र मला चांगल्या तऱ्हेने जाणतो. कारण समुद्राबद्दल मला आदर आहे आणि त्याच्याशी माझं विशिष्ठ नातं आहे. समुद्रामुळे तुम्हाला इथे आनंद उपभोगता येतो आहे. तो तुम्हाला इतका चांगला आत्मिक आनंद आणि संवेदना देत आहे. हिमालयांत जाण्याची जरुर नाही. कारण हिमालयाला जे काही आच्छादन आहे, ते समुद्राचे पाणीच आहे. जे पाऊस म्हणून येतं, हिमालयावर बर्फ बनून जातं आणि परत नदी होऊन सागराला येऊन मिळतं. ते एक वर्तुळ आहे. सर्व कांही समुद्रात विलीन होतं. सुर्याकडून त्याच्या उन्हातून करपून मेघ बनताना तपस्येमधून जातं. त्याप्रकारे आपल्याला इतरांची उष्णता आणि राग सहन करावयाचा आहे. आणि वाफा तयार करायच्या आहेत, म्हणजे आशिर्वाद, इतरांसाठी व्हायब्रेशन्स, जेव्हां मी एखाद्या रोग्याला बघते आणि त्याच्या वर उपचार करते त्याचवेळी मला सहन करावयास लागते.

मी ते शोषून घेतो आणि मग व्हायब्रेशन्स तयार होतात. आणि व्हायब्रेशन्स म्हणून त्यांचा प्रवाह सुरू होतो.

सहजयोगी म्हणून हे पण महत्वाचं आहे की, तुम्ही सर्व गोष्टींचं शोषण करणे. त्याला धरून चिकटून राहू नका. आणि त्याची वाफ होऊ द्या चुका सुधारण्याची आपल्याला ही पद्धत जाणली पाहीजे. सहजयोगी अजून माझ्याकडे कोणावर तरी उपचार करण्यासाठी येतात. मी कशाला उपचार केले पाहीजेत? तुम्ही उपचार कां करू शकत नाही? तुम्हाला कोणावर उपचार करण्याची भिती वाटते कां? तुम्ही सर्व त्यांच्यावर उपचार करू शकतां. त्यांना मदत करूं शकतां. जेव्हां अधिक लोकांवर तुम्ही उपचार कराल, तेवढे तुम्ही चांगले व्हाल. तुम्ही धाडस केले पाहीजे. इतरांवर उपचार करण्यासाठी तुम्हाला तेवढे धैर्य पाहीजे. इतरांवर तुम्ही उपचार केले नाहीत, तर तुमची वाढ होणार नाही. जेव्हां तुम्ही इतरांना बरे करता, त्यावेळी जास्त व्हायब्रेशन्स असतात. जर तुम्ही त्या व्हायब्रेशन्सचा उपयोग करणार नाही तर, देवाने तुम्हाला व्हायब्रेशन्स कां द्यावी? आपले हात पाय, मेंदू, आपण सहजयोगांसाठी वापरत नसलो, स्वतःमध्ये आपण व्हायब्रेशन्स तयार करत नसलो तर, जर तुम्ही तसे करीत नसाल तर, सर्वांना सतत अडचणी येत असतात. तुम्ही म्हणता मी ध्यान करतो. मी पुजा करतो, तरीही मला बरे वाटत नाही. व्हायब्रेशन्सचा शक्य असेल त्या प्रत्येक प्रकारे तुम्हाला उपयोग केला पाहीजे. आणि इतरांना बरे करण्यासाठी शक्य ते केले पाहीजे. तुम्हाला त्रास होईल अशी भिती वाटली तर बंधन घ्या. पण कमीत कमी माझ्या फोटोचा उपयोग करा. फोटो नंतर तुम्ही त्या व्यक्तीला स्पर्श करू शकता. आणि त्यांत काही त्रास होणार नाही. आणि शेवटी जर तुम्हाला त्रासाची भिती वाटत असेल. तर सहजयोगी होण्याचा काय उपयोग आहे? जर नाव सागर तरून जाणार नसेल तर ती बनविण्यात काय अर्थ आहे? तुमच्यात सागर तरण्याची क्षमता हवी. तुम्ही हा निश्चय केला पाहीजे की, आम्ही व्हायब्रेशन्स शोषून घेत आहोत आणि सर्व कांही स्वतः वर घेणार आहोत. हा विश्वास ठेवा की, तुम्ही सारे समुद्रासारखे आहांत. हा महागुरु आणि तुम्ही, जे कांही करीत आहांत ते, तुमच्यामध्ये व्हायब्रेशन्स तयार करीत आहेत, ज्यामुळे तुम्ही अनेकांना वाचवू शकता.

जेवढे जास्त तुम्ही देता तेवढे जास्त तुम्हाला मिळते. जेवढी जास्त व्हायब्रेशन्स तुम्ही द्याल, तेवढी जास्त तुम्हाला मिळतील. नेहमी इतरांना मदत करण्यासाठी व्हायब्रेशन्स वापरा. झाडांना, प्राण्यांना, निसर्गाला व्हायब्रेशन्स द्या. तुम्ही स्वतः व्हायब्रेट करू शकता. ती स्थिती यायची आहे. जेव्हां तुम्ही तुमची स्वतःचं पाणी तुम्ही व्हायब्रेट करू शकाल. तुम्ही सर्व तसे कार्यान्वित करून बरंच काही करू शकतां. पण स्वतःमध्ये विश्वास ठेवा. ज्यामुळे तुम्हाला मदत होईल. तुमचा स्वतःवरचा विश्वास की, तुम्ही महान सहजयोगी आहांत. आणि तुमच्या आईमध्ये पूर्णपणे विश्वास ठेवा.

"ईश्वर तुम्हाला आशिर्वाद देवो."



# सहज योग्यांच्या एकवीस पायऱ्या

एक पायरी चढल्याबरोबर प्रवासास सुरवात होते. सहज योग्याची ती पहिली पायरी म्हणजे आत्मसाक्षात्कार. परंतु एकच पायरी चढून थांबल्यास प्रवास केव्हाच पूर्ण होणार नाही.

आपण एकाच शरीराचे अंग प्रत्यंग असलो, आदिशक्तिच्या शरीराच्या पेशी असलो, तरी आपण स्वयंनिर्भर असतो. म्हणून प्रत्येकाने हा प्रवास एकट्याने व वैयक्तिकरित्या करायचा असतो.

आपल्याला चढायच्या असतात त्यापैकी काही पायऱ्या अजून अगम्य आहेत, काही केवळ आपल्या साठीच वैशिष्ट्यपूर्ण असतात. पण काही पायऱ्या सर्वज्ञात व सर्वमान्य असून या प्रवासास यशस्वी होण्यासाठी व्यक्तिला या पायऱ्या चढणे आवश्यक आहे. अशा एकवीस पायऱ्या असून आपल्याला सहजयोगी व्हायचे असल्यास या सर्व चढून जायला हव्यात. प्रत्येक पायरी अगदी लहान असली तरी सर्व पायऱ्या चढून गेल्यानंतर आपल्या घटित होण्याच्या दिशेकडे आपण फार मोठे पाऊल उचलतो.

**श्री माताजी कोण आहेत हे आपण विसरू नये.** आणि मी परमपित्याची प्रार्थना करीन, आणि ते तुम्हाला अधिक एक कम्फर्टर (आराम देणारे) देतील. ते कर्म्फटर आदिशक्ति असून माझ्या नांवाने परमपिता यांना पाठवतील. ते तुम्हाला सर्वकाही शिकवतील.

श्री येशू ख्रिस्त

"परंतु आजच्या या दिवशी मी जाहीर करते की मला मानवाला तारायचे आहे.

मी असे जाहीर करते की, आदिशक्ति जी आहे ती मीच आहे, सर्व मातांची माता आहे, आदिमाता आहे, परमात्म्याची शुद्ध इच्छा आहे, आणि त्या इच्छेचे सार्थक करण्यासाठी, या सृष्टीचे व सर्व मानवांचे सार्थक करण्यासाठी या शुद्ध इच्छेने अवतार घेतला आहे. आणि हे सर्व माझ्या प्रेमातून पेशन्स (धीरातून)माझ्या शक्ति मधून हे सर्व मी साध्य करीन अशी मला खात्री आहे.

या पूर्वी पुन्हा पुन्हा मी जन्म घेतला पण आता मी माझ्या संपूर्ण रूपात आणि शक्ति सहित आले आहे. केवळ मानवाला निर्वाण देण्यासाठीच किंवा मुक्ति देण्यासाठीच मी आले नाही तर तुमच्या परमपित्याला जे परमेश्वरी राज्य व आनंद तुम्हाला द्यायचे आहेत ते देण्यासाठी मी आले आहे."

श्री माताजी २-१२-१९७९

"म्हणून हा समय महत्त्वाचा आहे. याची जाणीव तुमच्या हृदयात हवी. तुम्ही अतिशय महत्त्वाच्या काळात येथे आला आहात आणि शिवाय जेव्हा तुम्ही माझ्या, समवेत असता तो काळ सर्वात महत्त्वाचा असतो आणि खऱ्या अर्थाने तुम्ही त्याचा पूर्ण लाभ घ्यायला हवा.

श्री माताजी २१-५-८४

**आपण रोज नियमितपणे ध्यान करायला हवे.**

"वृद्धिंगत होण्यासाठी आपण रोज ध्यान करायला हवे. रोज, अगदी रोजचे रोज, ध्यान करणे महत्त्वाचे आहे.

एखादे दिवशी जेवण करू नका. खाऊ नका, कामावर जाऊ नका, रोज करता त्यापैकी एखादी गोष्ट एक दिवस करू नका. पण रोज ध्यान करा. हे अत्यंत महत्त्वाचे आहे."

श्री माताजी १२-८८

"ध्यानासाठी अधीक वेळ देण्याची आवश्यकता नाही. पण, जो काही वेळ तुम्ही देता व जे काही तुम्हाला त्यातून प्राप्त होते, ते बाह्यात दिसून यायला हवे. तुमच्यातून ते बाहेर यायला हवे, दुसऱ्याला ते द्यायला हवे. अशा स्थितीचे संत तुम्हाला व्हायचे आहे. गहनतेमध्ये गेल्याशिवाय इतर सहज योग्यांना तुम्ही वाचवू शकणार नाही. व जे सहज योगी नाहीत त्यांना आपण वाचवू शकत नाही."

श्री माताजी २७-७-८१

"ध्यान आपल्या जीवनाचा अविभक्त भाग आहे. मानवाला जसा श्वास घ्यावा लागतो तसे तुम्हाला ध्यान करायला हवे. ध्यान करणार नसाल तर तुम्ही कधीही मोठे होणार नाही. तुम्ही तसेच रहाल. जेव्हा ध्यान करून गहन होता, तेव्हा तुमच्या व्यक्तिमत्वाचा विकास होतो. उथळपणाचा काही फायदा होणार नाही. या कारणासाठी ध्यान करायला हवे. पण ते फार वेळ नाही."

श्री माताजी २-५-८७.

"जे सहज योगात येतात आणि ध्यान करीत नाहीत व उन्नत होत नाहीत, ते नष्ट होतात अथवा सहज योगाच्या बाहेर फेकले जातात."

श्री माताजी २८-७-८५

**दुसऱ्यावर टीका करू नये.**

"तुमच्या प्रवृत्ती बदला. दुसऱ्यामधे चांगले काय आहे ते पहाण्याचा प्रयत्न करा. पहायला शिका, मी इतरांचे बद्दल बोलत नाही. मला सांगायचे आहे की निदान सहज योग्यांचे बरोबर तुम्हाला असे करता येईल.' त्यांच्यात चांगले काय आहे ते बघायला शिका, सहज योगासाठी त्यांनी काय चांगले केले आहे, तुम्हाला त्यांच्याकडून काय मिळाले, आहे. त्यांच्या समवेत कसे रहायचे, त्यांच्यातील चांगले काय का दिसू नये? त्यांच्याशी चांगले वागून त्यांना प्रोत्साहन देऊन, तुम्ही सहज योगाला मदत करता."

श्री माताजी २८-७-८५

"तुझ्या बांधवांच्या डोळ्यांतील कुसळ पहात असताना तुझ्या स्वतःच्या डोळ्यात असलेल्या मुसळाचा विचार का करीत नाहीस? दांभीक माणसा, प्रथम स्वतःच्या डोळ्यांतील मुसळ काढून टाक. मगच दुसऱ्याच्या डोळ्यातील कुसळ काढायचे तुला स्पष्ट समजेल."

श्री येशू ख्रिस्त

"दुसऱ्याच्या दोषांचेकडे पहाताना आपल्यातील दोष वाढतात."

श्री बुद्ध

"तुम्ही एकाच आईची मुले आहात तर इतरांच्यापेक्षा तुम्ही उच्च स्थितीवर कसे जाऊ शकाल? नेहमी तुम्ही आईचीच मुले असणार.

तुमच्या आईच्या नजरेत इतरांच्यापेक्षा तुम्ही उच्च कस असाल? ते शक्य नाही. उलट अशा कल्पना करण्याचा प्रयत्न केल्यास आई तुम्हाला शिक्षा देईल."

श्री माताजी २८-७-८५

नियमितपणे रोज जोडेपट्टी करावी. पाण्यात पाय ठेवून बसावे, नाकांत तूप सोडावे, एक दुसऱ्यांना चैतन्य लहरी द्याव्यात.

"आपण स्वतःशीच भांडू शकत नाही. केवळ सातत्याने सहज योग साधना करून, जोडेपट्टी पाण्यात पाय ठेऊन बसणे ध्यान करणे, इत्यादि) आत्मा आणि कुंडलिनी यांच्यावर सर्व काही सोपवायचे. ते आपल्यासाठी सर्व कांही घडवून आणतात. शिवाय, सर्व काही आपोआप होत असल्याने, अहंकार निर्माण होण्यास अथवा बौद्धिक कार्यास वाव राहू नये."

श्री माताजी २१-५-८४

"एक साधी गोष्ट आहे. तुम्हाला मी नाकात तुप सोडण्यास सांगीतले आहे. ही अगदी साधी पण महत्त्वाची गोष्ट आहे. तुमच्या सगळ्यांचे हंसा चक्र खराब आहे. आणि एड्स् च्या आजाराचे खराब हंसा चक्र एक लक्षण आहे. परंतु इतकी साधी गोष्ट सुद्धा नियमितपणे केली जात आहे."

श्री माताजी ५-५-८७

**आत्म्याच्या विरोधांत काही बोलू नये अथवा काही करू नये.** "काय बिघडले?

मी पाहिले आहे, लोक म्हणतात "मी धुम्रपान करतो आहे. पण अजून मला चैतन्य लहरी आहेत, मग त्यांत काय बिघडले? मी दारू पितो पण अजून मला चैतन्य लहरी आहेत. अजून मी अगुरूच्या कडे जातो पण मला चैतन्य लहरी आहेत. पूर्वीसारखेच माझे स्वैराचारी जीवन आहे, पण मला चैतन्य लहरी आहेत."

हे असेच वाढत जाते "अजून मला चैतन्य लहरी आहेत" पण एक दिवस चैतन्य लहरी थांबतात आणि तुमच्या लक्षात येते की तुम्ही सर्व मर्यादांच्या पलिकडे आहात. पूर्णपणे तुम्ही बाहेर फेकले जाता. तुम्ही कसे बाहेर जाता हे तुम्हालाच समजत नाही. हळू हळू तुमच्या लक्षात येते की टॅजन्ट प्रमाणे तुम्ही बाहेर गेला आहात. म्हणून फार काळजीपूर्वक रहायला हवे.

तर, तुमच्यामधेच दोन शक्ति (फोर्स) आहेत, केंद्रबिंदूकडे नेणारा व केंद्र बिंदू पासून दूर नेणारा.

एकादशांची शक्ति तुम्हाला केंद्रबिंदूपासून दूर नेते व त्याच्यामुळे तुम्ही बाहेर फेकले जाता.

सहजयोग कोणाच्या पाया पडत नाही. कोणाची खुशामत करीत नाही. कोणाच्या विनवण्या करत नाही. तुम्हाला रहायचे असल्यास पूर्णपणे रहायला हवे. रहायचे नसल्यास, सहज योग तुम्हाला अपेक्षेपेक्षाही जास्त जलद बाहेर फेकतो.

सहज योगाचे बाबतीत हेच अवघड आहे. हा बाहेर जाण्याचा रस्ता आहे हे मी तुम्हाला सांगून ठेवते. एक आई म्हणून तुम्हाला सांगते की सहज योग तुम्हाल बाहेर फेकण्यास उत्सुक आहे."

श्री माताजी २१-५-८४

**आपण सतत श्री माताजींच्या कॅसेटस् पहाव्यात अथवा ऐकाव्यात.**

'ते काय करतात, केंद्रावर एक टेप घेऊन जातात, सर्वजण ती ऐकतात, मग झाले.

प्रत्येकाच्या जवळ एक टेप हवी. ते सुद्धा लोक करीत नाहीत. एवढेच नव्हे, तर काही वेळाने, संपुर्ण देशांत फक्त एकच कॅसेट असेल. "आम्ही ती सगळीकडे पाठवितो. आज न्यूयार्कला. उद्या बॉस्टनला. तुम्ही पुन्हा पुन्हा कॅसेट ऐकायला हवी.

कागद पेन्सिल घेऊन बसा व मी काय सांगितले आहे ते नीट समजावून घ्या. भयंकर, अगुरूंच्या टेपस, प्रत्येक कार मधे, प्रत्येक ठिकाणी आहेत. प्रत्येकजण कॅसेटस जवळ बाळगतो. आणि सहज योग्यांच्याकडे कॅसेटस का असून नयेत. कॉपीज काढता येतील."

श्री माताजी विराट पूजा.

आश्रमात कोणत्याही प्रकारे उपद्रव निर्माण करू नये. आश्रम शांति व आनंदाचे स्थान असायला हवे.

"आता, ज्यांना सामूहिकतेमधे रहाता येत नाही, ते सहज योगी नव्हेत. होऊच शकत नाहीत. सामूहिकतेच्या बाहेर जाण्याचा प्रयत्न करणाऱ्यांनी हे लक्षात घ्यावे की त्यांच्यातच काहीतरी कमतरता आहे.

दुसऱ्याच्या संगतीत आनंद वाटायला हवा. दुसऱ्यांच्या बरोबर काम करणे आवडायला हवे. दुसऱ्यांच्या सौंदर्याचा, दुसऱ्यांच्या चैतन्य लहरींचा आनंद घ्यावा. पण ज्यांना असे वाटते की आपल्यासाठी वेगळे असावे, वैयक्तिक खाजगी असावे, ते अजून पूर्ण परिपक्व झाले नाहीत.

सामूहिकता, हा तुमची परीक्षा करण्याचा चांगला मार्ग आहे. आपण मोठे होतो तसे आपल्याला वेगळेपण हवे असते, वेगळ्या वस्तू लागतात. त्यात आनंद नसतो, काहीच आनंद नसतो. म्हणून स्वतःची परीक्षा करण्यास प्रत्येक सहज योग्यास उत्तम मार्ग म्हणजे "आपण किती कलेक्टिव्ह आहोत," ते पहाणे, दुसऱ्याच्या संगतीत राहणे मला किती आवडते आणि माझे स्वतःचे निराळे असावे - माझे मूल, माझा पति, माझे स्वतःचे कुटुंब, माझी स्वतःची खोली असे किती वाटते. ज्या लोकांना असे वाटते ते अजूनी पूर्ण सहजयोगी झाले नाहीत. ते अजून अपरिपक्वच आहेत आणि ज्या स्थानावर आहेत तिथे असण्यास अपात्र आहेत.

**आपणास माहित असलेले प्रश्न आपणच सोडविण्याचा प्रयत्न करायला हवा.**

तुमच्यात काहीतरी बिघडले आहे, हे जो पर्यंत तुमच्या लक्षांत येत नाही, तो पर्यंत तुम्ही स्वतःला ठीक करू शकत नाही. "तुमच्यात हे बिघडले आहे, ते बिघडले आहे, अमूक चक्रावर पकड आहे व ती काढायला हवी," असे सहजयोग तुम्हाला सांगतो. ती पकड काढून टाकल्यास तुम्हाला पूर्णपणे बरे वाटते. तुमचेच शरीर आहे आणि तुमचीच चक्रे आहेत. आणि तुमचेच जीवन आनंदी व्हायला हवे, म्हणून तुमच्यात काय बिघाड आहे ते लक्षात आल्यास तो काढून टाकण्याचा प्रयत्न करायला हवा."

श्री माताजी १२-५-८७

"सगळे बदलून टाका आणि अगदी नवीन व्यक्ति बना. फुला सारखे तुम्ही उमलता, मग वृक्ष होता आणि मग तुमचे स्थान ग्रहण करता. सहजयोगी म्हणून तुमचे स्थान ग्रहण करा. ते अगदी सोपे आहे.

ते अगदी सोपे आहे. मला प्रसन्न करायला हवे कारण मी चित्त आहे, मी प्रसन्न झाले तर तुमचे काम झाले. परंतु भौतिक गोष्टींनी किंवा वादविवादाने मी प्रसन्न होत नाही तर तुमच्या उन्नतीनी प्रसन्न होते. म्हणून त्याच्यावर स्वतःला पडताळून पहा.

श्री माताजी २१-५-८४

"स्वतःला अलिप्त करण्याचा प्रयत्न करा. क्रोध, वासना, लोभ प्रत्येकावर नियंत्रण मिळवा, कमी खा, खादाड लोकांसारखे भरमसाठ खाऊ नका. एखादे दिवशी मेजवानीचे प्रसंगी तुम्ही जास्त खा, परंतु सारखेच जास्त खाऊ नये. ते सहजयोग्याचे लक्षण नव्हे. कंट्रोल करण्याचा प्रयत्न करा. तुमच्या बोलण्यावर कंट्रोल करा. तुमच्या बोलण्यातून क्रोध व्यक्त होतो की खरी करूणा व्यक्त होते की तुमच्यात कृत्रिम कारूण्य आहे."

श्री माताजी २१-५-८४

शिवाय माझी मुले असणे सोपे नाही, कारण तुम्ही काय करता ते मला समजते, तुमची प्रत्येक गोष्ट मला माहिती असते, मी तुम्हाला सुधारत असते ते तुम्ही जाणताच, परंतु जेव्हा तुम्ही मला धरून राहता तेव्हा असे दिसते की ज्यांनी उन्नत होण्याचा निश्चय केला आहे आणि आपल्या अंतर्यामी परिर्वतन करून अधिक चांगल्या स्थितीमध्ये उत्क्रांत होण्यात प्रयत्नशील असणाऱ्यापैकी तुम्ही आहात, सहजयोगी असणे सोपे नव्हे, की तुम्ही पैसे दिलेत आणि सदस्य झालात आणि माताजींचे शिष्य झालांत. माझे शिष्य झाल्यावरही तुम्हाला काही परीक्षांमध्ये उतरावे लागते आणि त्यासाठी मेहनत करावी लागते. तुमच्या कुटुंबामध्येच राहून पुष्कळ तपस्या करावी लागते.

**सुधारणा करायला सांगितल्यास प्रतिक्रिया व्यक्त करू नये.**

"तुमच्या बद्दल कोणी काही म्हणाले व ते खरे नसेल तर त्याची काळजी करण्यासारखे काय आहे? परंतु लोक म्हणतात ते खरे असल्यास त्यासाठी काहीतरी करायलाच हवे."

मी तुमच्यावर रागावले. तुम्हाला बोलले, तुमचे लाड केले अमुक करू नका, असे सांगितले, फार निकट येऊ नका लांब रहा, असे सांगितले काही जरी केले तरी ते तुमच्या हिताचे असते.

आणि, माझ्या दृष्टिने तुमचे हित एकच आहे, तुम्ही बंधमुक्त व्हावे, माझ्याकडून काहीतरी तुम्ही मिळवावे. माझ्यातून तुमचा उत्कर्ष व्हावा."

श्री माताजी २१-५-८४

**"आपण सर्वज्ञ असून, आपणास आवडेल असे दुसऱ्यांनी वागावे अशा भ्रमात आपला अहंकार आपल्याला मूर्ख बनवून ठेवणार नाही, इकडे आपण दक्ष असावे.**

तुमच्या अहंकाराशी लढू नका. झगडण्याचा प्रयत्न केल्यास तो अधिकच तुमच्या डोक्यावर चढेल. लढण्याचा हा मार्ग नाही, की तुमच्याकडे अहंकार आहे आणि तुम्ही त्यांच्याशी लढाई करीत आहात, 'मी आता तुला ठोसा मारतो, "मग तो वाढेल अधिक ठोसे माराल तसा अधीक मोठा होईल, अहंकाराशी कधीही भांडू नका. केवळ त्याला पहाणे हाच एक मार्ग आहे.

तुमचे चित्त फार महत्त्वाचे आहे. तुमचे चित्त आता प्रकाशीत झाले आहे. ज्याच्याकडे तुम्ही पहाल ते योग्य आकाराचे होईल.

अहंकार मोठा झाल्यास, त्याच्याकडे फक्त लक्ष देवा, उत्तम म्हणजे, आरशा मधे स्वतःला पहा आणि विचारा "काय श्री ईगो कसे काय आहे?" मग तो खाली येईल. पण त्याच्याशी भांडू नका फक्त पहायचे असते. अनेक प्रकारचे अहंकार असू शकतात. अधिक शिकलेले असाल तर तुम्ही अहंकारी होता, शिकलेले नसाल तरी अहंकार असतो. कारण आपण कोणीतरी आहोत हे दाखवायचे असते. विविध प्रकारचे अहंकार असतात.

श्री माताजी २८-७-८५

आता, माणसांच्या बाबतीत मुख्य प्रश्न निर्माण होतो की ते स्वतःला गुरू समजू लागतात. ते सहज योगाचे विषयी बोलू लागतात. व त्यांना असे वाटते की ते श्रीकृष्णच झाले आहे. सहज योगा विषयी अज्ञानी असलेल्या व्यक्तिपेक्षाही त्यांना जास्त अहंकार असतो. इतक्या प्रचंड अहंकारातून ते बोलू लागतात की मलाच त्यांची भीती वाटते. कधी कधी मला वाटते की त्यांना किती सहज योग समजला असेल? पण ते मात्र स्वतःचेचे खरे आहे असे बोलतात. मग मला भिती वाटते. कांही वेळा असेही म्हणता येईल की त्यांना वाटते प्रोटोकॉल (मान सन्मानाच्या पद्धती) बरोबर नाहीत. प्रोटोकॉल व्यवस्थित असावा आणि आम्ही त्याचे बाबतीत दक्ष आहोत.

श्री माताजी २८-७-८५.

काही जण म्हणतात की आता आम्ही इतके मोठे झाले आहोत की आम्हाला पाण्यात पाय ठेवून बसण्याची आवश्यकता नाही. ध्यान करण्याची आवश्यकता नाही. असेही काही असतात आणि असेही काही जण असतात की ते म्हणतात, आता आम्ही सहज योगी आहोत आणि पाप आम्हाला स्पर्श करू शकणार नाही. आम्ही उच्च स्थितीला गेलेले आत्मे आहोत. परंतु सर्वात वाईट लोक ते आहेत की जे माझे नांव घेऊन सांगतात की "माताजी असे असे म्हणाल्या आणि मी तुम्हाला सांगतो आहे कारण माताजींनी सांगितले आहे" आणि वास्तविक मी तसे काहीच म्हटले नसते व ते सर्व खोटे सांगत असतात.

श्री माताजी ६-८-८८

**आपल्या जीवनांत महत्त्वाच्या नियमांचे पूर्णतया अवलंबन करायला हवे.**

तुमच्या शेजाऱ्यावर स्वतःप्रमाणे प्रेम करा." तुमचा शेजारी कोण? सहज योगी, त्याच्या बाजूला रहा.

आणि तुमच्या आईवर विश्वास ठेवा. जसा मी तुमच्यावर विश्वास ठेवला आहे, तसा तुम्ही माझ्यावर ठेवायला हवा मग सर्व कार्यान्वित होईल. हा विश्वास ठेवण्यासाठी तुमचे हृदय उघडा. यांत मान सन्मान मिळेल की नाही याची चिंता करू नका. कारण हृदयाला माहिती असते, तुमच्या प्रेमळ हृदयात जो विश्वास असतो तो विश्वास सर्व काही करीत असतो. प्रेमच सर्व अद्ययावतता, सुगंधीतपणा देते. प्रेम बोलण्यातच नसावे तर खरोखरीच प्रेम आपल्यामध्ये असावे.

श्री माताजी २१-५-८४

आई सारखे व्हा, असे कारूण्य तुमच्यामध्ये विकसित होऊ दे की इतरांच्यासाठी तुमच्यामधे आईसारखे किंवा पित्यासारखे प्रेम असेल. एका १०८ वर्षे वयाच्या व्यक्तिची मी आई आहे. खरोखरीच इतरांना तुम्ही आईचे प्रेम व कारूण्य द्यायला हवे. स्वतःच्या ऐष आरामाच्या फायद्यांचा विचार न करता स्वतःच्या ऐष आराम कसा मिळेल ते न पहाता, इतरांना आपल्याला कसा ऐष आराम देता येईल याचा विचार करावा.

तुम्हाला मी जे प्रेम व करूणा दिली आहे ती अंतर्यामी साठवून ठेवून दुसऱ्यांना द्यायला हवी. अन्यथा तुम्ही अविकसित रहाल व संपूर्ण संपून जाल. तुमच्यामधील प्रेम व करूणा बाह्यात प्रवाहित व्हायला हव्या."

श्री माताजी २८-७-८५

**आपल्या बोलण्यात किंवा वागण्यात दुराग्रह (फॅनॅटिकल) असू नये.**

"आता काही लोकांच्यावर एखाद्या धार्मिक कृत्याचा प्रभाव पडतो. उदा. मी पाहिले आहे की काही सहज योगी पूजेला येतात, तेव्हा बंधन घेतात, रस्त्यांत चालताना बंधन घेतात, कोठेही गेले तरी वेड्यासारखे बंधन घेतात, हे निव्वळ कंडिशनिंग आहे, तारतम्य नव्हे, सहज योग नव्हे, बंधन घ्यायचे की नाही हे नीट पहायला हवे. आईच्या समोर बंधन असतेच तर मग स्वतःला बंधन देण्यासारखे त्यात काय आहे? पण, मी बोलत असते त्यावेळीही लोक कुंडलिनी चढवतात, बंधन घेतात, मला वाटते ते वेडेच आहेत."

श्री माताजी १०-७-८८

"तुम्ही पहाल, तर, अजूनही प्रत्येक धर्मात अनेक कर्मकांडे चालू आहेत. अवतरणाच्या मृत्यू नंतर लोकांनी कर्मकांडाना सुरवात केली. श्रीकृष्णांच्या मृत्यूनंतर लोकांना समजेना की आता काय करावे. कारण कर्मकांडे असू नयेत असे त्यांनी स्पष्ट सांगितले होते.

परिणामतः त्यांचा अवतार संपल्यानंतर लोक गंभीर स्वभावाचे झाले आणि धर्मामधे गांभीर्याला व सर्व कर्मकांडांना सुरवात झाली. लोक अतिशय कर्म कठोर झाले आणि त्याच्याबरोबर जीवनातला आनंद निघून गेला व इतर अनेक गोष्टींची सुरवात झाली. धर्मातील अनेक कर्मकांडाच्या खुळचटपणाला पायबंद घालण्यासाठी श्रीकृष्णांचे आगमन झाले होते त्यांचे अवतरण फार महत्त्वपूर्ण होते. पण किती लोकांना ते समजले आहे हे माहिती नाही. ही सर्व लीला आहे, परमेश्वराचा खेळ आहे, हे दाखवून देण्यासाठी ते आले होते. त्यात गंभीर होण्यासारखे काय आहे? कर्मकांड होण्यासारखे काय आहे? परमात्म्याला कोणत्याही कर्मकांडात तुम्ही बांधू शकत नाही. म्हणून स्वतःला कोणत्याही कर्मकांडात तुम्ही बांधू शकत नाही. म्हणून स्वतःला कोणत्याही कर्मकांडात बांधून घेऊ नका, हे सांगण्यासाठी ते पृथ्वीवर आले होते."

श्री माताजी

**आपापसातील संबंध विकसित करण्यासाठी कार्यरत असावे. मर्यादांची जाणीव असावी.**

सहज योग्यांच्या बरोबर तुमचे संबंध आदर्श असावेत. नाहीतर एखादा स्क्रू ढिला असायचा. सर्व संबंध आदर्श करा. समजा एक व्यक्ति अहंकारी आहे, असे तुम्हाला वाटते, त्यावेळी प्रथम तुमच्यांत काही बिघाड आहे का ते पहा, "मी परिपूर्ण आहे का? मी व्यवस्थित आहे का?

मी अहंकारी असेल, तर प्रथम मी ठीक झाले पाहिजे. मी अहंकारी नाही आणि म्हणून दुसऱ्यावर प्रभुत्व चालवीत नाही, असे लक्षात आल्यास त्यांच्याशी गोड वागुन त्याचा अहंकार खाली आणा, त्यांच्याशी प्रेमाने वागा, म्हणजे त्याचा अहंकार खाली येईल. काहीही करून आदर्श संबंध प्रस्थापित करा. ते अगदी सोपे आहे.

एक दुसऱ्यांशी परिपूर्ण संबंध असावेत. स्वतःशी मात्र तुमचे संबंध कठोर असावेत. स्वतःला स्पष्टपणे बजावायला हवे की - "मला माझे हे शरीर परमेश्वराला अर्पण करायचे असेल तर स्वतःला परिपूर्ण करायला हवे." दुसरे म्हणजे दुसऱ्यांशी आदर्श संबंध बनवायलाच हवेत. सहज योग्याचे दुसऱ्या सहज योग्याशी नाते महान असते. सवार्वत मोठे नाते ते आहे. तुमच्या बहिणीशी, भावाशी, तुमचे संबंध आदर्श असावेत.

**प्रत्येक आठवड्यात कमीत कमी एका सार्वजनीक कार्यक्रमात आपण भाग घ्यायला हवा.**

एका बाजूला, मला मुर्ख लोक आहेत असे दिसते आणि दुसऱ्या बाजूला अनेक प्रामाणिक साधक आहेत. त्यांच्या पर्यंत कसे पाहोचायचे. चिखलाने झाकला गेलेला हिरा असावा असे ते आहेत आणि चिखल तरी किती आहे. चिखलात रूतलेला हिरा बाहेर काढण्यासाठी, अज्ञानाच्या खाणीत खोलवर जावे लागते व त्या ठिकाणी चिखलात हरवलेला हिरा सापडतो.

मला अशी काळजी वाटते की हा चिखल त्यांच्या बुद्धिला त्यांच्या दृष्टिला व जे काही इतर त्यांच्याकडे आहे त्या सर्वांना इतका भरून टाकेल त्यांना कधीच साक्षात्कार मिळणार नाही, ते घालवून बसतील."

श्री माताजी १९-१-८४

"सहज योग हा विषय अंतर्यामी फार खोलवर जायला हवा. कारण सहज योग जर तुम्हाला समजला असेल - तुम्हाला समजला की नाही अथवा तुम्ही जाणले आहे की नाही हे मला माहिती नाही - तर सहज योग आपण अनुभवातून शिकलो - तुम्ही अनुभव घ्यायचा व मग विश्वास ठेवायचा. मी जे सांगते आहे त्याचा परिणाम तुमच्या मनावर

होतो, असे नव्हे तर तुम्ही स्वतः अनुभवता व शिकता.

श्री माताजी २१-५-८४

सहज योग जाहिराती देण्याने अथवा माझ्या फोटोंने कार्यान्वित होणार नाही. तो कार्यान्वित होणार आहे. तुमच्या कार्य करण्याने, जबाबदारी घेण्यामुळे आणि सहज योगाला उचलून धरण्याने सहज योगाचा प्रसार करून त्यास प्रस्थापित करणे, ही तुमची तुमचे जबाबदारी आहे."

श्री माताजी, श्री विराट पूजा.

"खरे म्हणजे मला येण्याचीही आवश्यकता नाही, परंतु बोलण्याशिवाय सहज योगात कोण येईल. कोणीच येणार नाही. म्हणून मला बोलावे लागते. आणि मी बोलतेच आहे. इतकी भाषणे केली आहेत की तुम्हाला कल्पना येणार नाही. लंडनमधे माझी कमीत कमी एक हजार भाषणे आहेत व त्या मंडळींना वाटते की ती भाषणे महान आहेत. मला माहिती नाही, पण आता भाषण करणे थांबवावे असे वाटते.

त्या दिवशी कोणीतरी भाषण करीत होते. ती व्यक्ति चांगली भाषण करते, त्याचे मला फार बरे वाटले. मी म्हटले, आता भाषणे करण्यातून मी निवृत्त होईन, फक्त कुंडलिनी जागृति करेन, तुम्ही भाषणाचे बघा, कदाचित तुमच्यापैकी कोणीतरी सहज योगांत उत्तम वक्ता होईल व अतिशय भाषण करण्यातुन मला मोकळे करेल."

श्री माताजी २७-५-८५

**आपल्यामधील कमतरतांच्या साठी कोणी सबबी सांगू नये.**

"तुम्ही चुकीचे काम करता तेव्हा तुमच्यापैकी अनेक जण म्हणतील "माझ्या डाव्या स्वाधिष्ठानावर पकड होती" काही म्हणतील "माझ्यात भूत होते" तर आणखी काही दुसऱ्या कशाला तरी दोष देतील.

तुम्ही कशालाही दोष द्या, पण कोणी तुम्हाला विचारले आहे? तुम्हीच स्वतःला विचारता, तेव्हा माझी भक्ति म्हणजे, स्वतःला सामोरे जाऊन, आपण काय करतो ते स्वतःच पहावे."

श्री माताजी २८-५-८५

"कोणत्याही सहजयोग्याला विचारा "तू हे का केलेस? तो म्हणेल "बहुतेक भूत असेल" तुम्ही विचाराल की हे असे कसे काय केलेस?" तर तो सांगले मला माहिती नाही भुतानेच ते केले आहे" ते नसतातच भूतच असतात."

श्री माताजी २७-५-८५

"वर्तमानात रहाण्याचा प्रयत्न करा. वर्तमानापासून पलायन करू नका, वर्तमानाला सामोरे जा. अपराधी वाटून घेऊ नका. अथवा भूताला दोष देऊ नका. दोन्ही तुम्हाला वर्तमानापासून दूर नेतील.

आता पहा, संपूर्ण निसर्ग, संपूर्ण ईश्वरी शक्ति कित्येक युगांची तुमची इच्छा," प्रत्येक गोष्ट तुमच्या बाजूला आहे.

समय आला आहे, तुम्ही आहात, आपल्याला काय करायचे आहे?

जेव्हा स्वतःस चुकीचे वागताना पहाल तेव्हा स्वतःलाच शिक्षा करा. ईश्वराने तुम्हाला शिक्षा करण्यापेक्षा तुम्हीच स्वतःला शिक्षा करा. कारण ईश्वराची शिक्षा फार कडक असते. परंतु अपराधी वाटून घेऊ नका, कारण तुम्ही कोणतीही चूक केली नाही.

**आपण इतरांचे वर मतप्रदर्शन करू नये.**

माणसाची चांगली बाजू का पाहू नये? वाईट बाजू पाहून ती आपल्याला सुधारता येत असल्यास ठीक आहे. पण त्यांत सुधारणा करणे शक्य नसल्यास तुम्ही स्वतःच वाईट होता. सुधारणा करता आल्यास फारच चांगले, पण तुम्हाला जमणार नाही.

शिवाय लोक नेहमी म्हणतात, "मी नसते ते केले" परंतु तुम्ही दुसरे काहीतरी केले ते इतर करणार नाहीत.

दुसऱ्यांची परीक्षा करतेवेळी प्रथम स्वतःची परीक्षा करायला हवी, हे समजले पाहिजे. कशाच्या आधारावर तुम्ही परीक्षा करता? तुमचा अहंकार आणि मन हा दोष सगळीकडे आहे, हे मी पाहिले आहे. येथून पुढे तो अजिबात असू नये.

पण तुम्ही एक दुसऱ्याचे दोष पहाणार नाही तर चांगले गुण पहाणार आहात."

श्री माताजी २८-७-८५

जेव्हा मी सहजयोगीच सहजयोग्यांवर टीका करताना पाहते त्यावेळी मला आश्चर्य वाटते, कारण तुम्ही एकाच शरीराचे अंग प्रत्यंग आहात. मी टीका करू शकते ते ठीक आहे. पण तुम्ही का करता? तुम्ही फक्त एक करायचे की एक दुसऱ्यांवर प्रेम करायचे. ख्रिस्तांनी हे तीन वेळा सांगितले, मी आता पर्यंत एकशेआठ वेळा सांगितले आहे, की तुम्ही एकमेकांवर प्रेम करा. तुमच्या मधील कारूण्य व्यक्त करण्याचा हा एकच मार्ग आहे. मी जर तुम्हाला केव्हा तरी प्रेम दिले असेल तर तुम्हाला इतरांबद्दल पेशन्स (धीर) व प्रेम असायला हवे.

श्री माताजी ७/८५

"दुसऱ्याची परीक्षा करू नका, म्हणजे तुमची परीक्षा होणार नाही, तुम्ही जशी दुसऱ्याची परीक्षा कराल तशीच तुमचीही होईल."

श्री येशू

**आपण निरर्थक गप्पा मारू नये.**

"इतरांवर सरकॅस्टीक(छदमीपणाने) मत प्रदर्शन करू नये. हा असाच आहे. तो तसाच आहे. एकमेकांवर असे मत प्रदर्शन करणे मला अजीबात आवडत नाही. तुम्ही सर्वांनी एकमेकांना आदर दिला पाहिजे. एखादी व्यक्ति गर्विष्ठ अथवा स्वार्थी असेल तर ते लगेच लक्षात येईल व त्याच्यावर उपाय केले जातील. म्हणून तुम्ही काही मत प्रदर्शन करू नका. सार्वजनिक कार्यक्रमाचे वेळीही मी असे बोलणे ऐकते ते फार वाईट आहे.

श्री माताजी २४-३-८१

"काही सहजयोगींना सतत बोलण्याची वाईट संवय आहे, त्या सारख्या बोलतच राहतात, हे फार वाईट आहे. त्यांच्यात अद्याप बरेच काही कमी आहे असे दिसते. केवळ साड्या नेसून किंवा कुंकु लावून कोणी सहजयोगी होत नाही. सर्वात प्रथम, तुमच्यात गुरूत्व आहे का? आवश्यक असेल तेव्हाच तुम्ही बोलले पाहिजे, काही स्त्रिया सतत बोलत राहतात, काही तरी गोष्टी सांगतात पण उभ्या राहून सहजयोगावर

भाषण देणार नाहीत. कुरबूर करायची असेल तर तिथे त्या जातील, म्हणून या बाबतीत तुम्ही काळजी घ्यायला हवी. एखादी व्यक्ति टिका करीत असेल तर तुम्ही शांत रहा. ही शांती प्रस्थापीत व्हायला हवी. या शिवाय मी पाहिले आहे की माझ्या उपस्थितीतही लोक आपपसात बोलतात हे फार चूक आहे. दुसऱ्या विषयी चर्चा करण्याचे तुम्हाला कोणतेही कारण नाही. आपण आपल्या एका हाताच्या वागण्याची (कॅरेक्टरची) दुसऱ्या हाताशी चर्चा करतो का? लग्नाचे काय झाले, ह्याचे काय झाले, त्याचे काय झाले, एका दृष्टीने तुम्ही लग्न झालेले लोक नव्हेत. तुमचे सहजयोगाशी लग्न झाले आहे.''

श्री माताजी ८-७-९०

''मी ईश्वरी कायद्यान्वये व प्रषितांच्या वचनांन्वये पालन करते'' असे तू कसे म्हणू शकतोस?

कारण, ''तुझ्या शेजाऱ्यावर स्वतःवर प्रेम करशील इतके प्रेम कर'' असे लिहिले आहे, आणि पहा, तुझे अनेक बांधव, अब्राहमची मुली व मुले, घाणेरड्या आहेत, भुकेनी मृत्यूमुखात जात आहेत, येथे तुझे घर अनेक चांगल्या गोष्टींनी भरले आहे पण त्यातील एकही गोष्ट घराबाहेर, त्या लोकांच्या पर्यंत जात नाही.

श्री येशू

आपण चैतन्य लहरीहून अधिक संकल्पनांना महत्त्व देऊ नये.

तुम्ही सतत लक्षात ठेवायला हवे की आपण आता साक्षात्कारी जीव आहोत. आपल्याला चैतन्य लहरी प्राप्त झाल्या आहेत. परीक्षा करण्याचा हाच एक मार्ग आहे. याच पद्धतीने समजावून घ्यायचे आहे. दुसऱ्यांना समजू शकण्याचा चैतन्य लहरी हा एकच मार्ग आहे दुसरा कोणताही नाही. तुम्हाला वाटेल व्यक्ति दिसायला चांगली आहे, वागण्यात लाघवी आहे पण विचारातून कदाचित साप बाहेर येईल.

म्हणून माणसाला पारखण्याचा चैतन्य लहरी हाच एक उत्तम उपाय आहे. तुम्हाला काय समजले किंवा वरवर पारखण्याच्या पद्धती नव्हे अजून सुद्धा दुसऱ्याला पारखण्यासाठी आपण अनेक प्रकारचे आपल्या मनावर झालेल्या संस्काराचा उपयोग करतो. हे संस्कार आपल्या जजमेंटला, आपल्या पारखण्याला एकांगी स्वरूप देतात. म्हणून चैतन्य लहरी पाहणे हा उत्तम उपाय आहे. चैतन्य लहरीच्या माध्यमातून काय घडत आहे ह्याचे खरे ज्ञान मिळेल.

श्री माताजी १६.५.८७

तुमची आई बोलण्यात पारंगत आहे आणि ती तुमच्याशी बोलते परंतु या सर्वांना तुम्ही बुद्धिने चिकटून बसू नका. उदाहरणार्थ श्री माताजी असे म्हणाल्या, सर्व जण उत्साहाने चर्चा करतात हे होतं, ते होतं, परंतु माझे बोलणे तुमच्या अंतरंगाचा अविभक्त भाग होऊन राहात नाही, ही बौद्धिक लिप्तता (चिकटणे) आजकाल सगळीकडेच झाले आहे. सगळ्या लोकांना सगळी माहिती असते परंतु अंतर्यामी काहीच नसते. या बौद्धिक चिकटण्याला खरे म्हणजे उपाय करून काढून टाकले पाहिजे. घटित होणे म्हणजे पाहणे हेच अनुभव घेणे आहे. उदाहरणार्थ मला या ठिकाणी यायचं आहे ते येथे येऊनच पहायला हवे, मी केवळ विचार करत बसले, बौद्धिक कल्पना लढवल्या, बुद्धिने चित्र तयार केले तर त्याचा काही उपयोग नाही, ते सत्य असणार नाही. म्हणून तुम्हाला एकदा जाणीव झाली की तुम्ही स्वतःच पाहू लागता म्हणून पाहायला....

आपली सवय व समय यांच्या बाबतीत आपण उदार असावे. तुम्हाला काय प्राप्त करून घ्यायचे आहे, ते स्पष्टपणे लक्षात घ्या. सहज योगी म्हणून जीवनात तुम्हाला काय मिळवायचे आहे, ते नीट समजावून घ्या. आता तुम्ही परिवर्तित लोक आहात. जे स्वतःच्या मिळकतीच्याच मागे लागले आहेत, अशा प्रकारचे लोक तुम्ही नव्हेत, ज्यांना भौतिक गोष्टींची अन्न वस्त्रांची वगैरेची चिंता आहे असे तुम्ही नव्हेत. तुमच्या वैयक्तिक जीवनाची आरोग्याची, फार काळजी घ्यावी लागते, असेही लोक तुम्ही नव्हेत.

तुम्हाला फार करीयरची काळजी असेल, माझी नोकरी कशी चांगली राहील, इत्यादी, तर तुम्ही सहज योगाच्या बाहेर जावे, हे बरे. आम्हाला त्याचा काही उपयोग नाही.

तिसरे म्हणजे काही लोकांच्या विश्वास असतो ''माझी प्रिय माणसे, माझी बायको हे, ते वगैरे'' तुम्ही येथे का आलात, कशा करता आलात? माझी मुले, माझे घर, माझी आई, माझे वडील, विविध प्रकारचे लडबडलेले लोक असतात.

तुम्ही या सर्वांच्यावर उठू शकत नसाल, तर मला तुम्ही मदत करू शकत नाही. तुम्ही कणखर लोक व्हायला हवे. तुम्ही पराक्रमी, ध्येयवादी आणि उदात्त विचाराचे असे लोक व्हायला हवे.

श्री माताजी २८-७-८५ शिका. बौद्धिक संकल्पनाच्या बाहेर या कारण त्यामुळे तुम्हाला वास्तवाचे ज्ञान होत नाही, जे काही तुमच्याकडे असते ते बौद्धिक स्वरूपाचं ज्ञान असते. खरे ज्ञान तुमच्या अंतर्यामीचा अविभक्त भाग असतो.

श्री माताजी २७-५-८५

आपण श्री माताजींच्या घरांत राहतो हे कायम लक्षात ठेवावे. आश्रमा संबंधी केव्हाही तक्रारी करू नयेत. आश्रम हे तुमच्या आईचे मंदिर आहे. हे स्थान मंदिरासारखेच असायला हव. आश्रमवासियांनी आणि बाहेरून येणाऱ्यांनी त्याची काळजी घ्यायला हवी. जसं तुम्ही तुमच्या मुलांना घेऊन आलांत तरी त्यांना प्रत्येक खोलीत जाऊ देऊ नका.

ही वास्तु मंदिरा सारखी जतन करायला हवी. येथे रहाणाऱ्यांनी लक्षात ठेवावे की ते इथे ट्रेनिंग साठी राहिले आहे, याचा सुविधा म्हणून उपयोग करू नये.

श्री माताजी २५-३-८१

**आपण वैयक्तिक गोष्टींना सहजयोगाच्या कार्याच्या आड आणू नये.**

''परंतु मला आता दिसते आहे की आणखी एका प्रकारची गुलामगिरी आहे. ती म्हणजे स्वार्थीपणाची, आत्मकेंद्रित पणाची, ''मला हा ऐष आराम हवा, मला हे हवे, ते हवे, मला मजा यायला हवी, इत्यादि.'' तुम्हाला आनंद व्हायला हवा, नाहीतर याला काही महत्त्व नाही. म्हणजे या सर्वांतून तुम्हाला काही तरी वाटायला हवे.

लोक काय करतात ते मला समजतच नाही. कोणत्या प्रकारचे कर्म ते करीत आहेत जे ध्येय आहे त्या ध्येयाची उंची त्यांना गांठता

येत नाही. त्या पातळीवर त्यांना पोहोचता येत नाही. तुम्हाला काय मिळवायचे आहे? तुम्हाला सर्व जगाला वाचवायचे आहे. म्हणून आता उठा तुमच्या लहान आणि कमकुवत मनाच्या बाहेर पडा. इतकी उंची गाठा की तिथे तुमच्या लक्षांत येईल की तुम्हाला सर्व मानवतेला वाचवायचे आहे. तुम्हाला जर ते जाणवत नाही तर तुम्ही सहजयोग सोडावा हे बरे. सहजयोग येऱ्या गबाळ्यासाठी नाही. येऱ्या गबाळ्याचे काम नव्हे.

श्री माताजी २७-५-८५

आपण लक्ष्मी सांभाळून ठेवण्याची जबाबदारी आपण घेतली नाही तर भौतिक विश्वात खोलवर शिरणे सहजयोगाला अवघड जाईल कारण आश्रम कोण बांधेल, आणि कार्यक्रम कोण घेईल, नेहमी सहजयोगात या त्या कारणांसाठी पैसे देण्यास सांगितले जाते आणि लोक कुर कुर करतात. परंतु ते लोक केवळ स्थूल अथवा भौतिक स्वरूपाच्या नाटकांकडेच पाहतात. त्याचा सूक्ष्म अर्थ पहात नाहीत. तो म्हणजे लक्ष्मी विष्णू तत्त्वाकडे लक्ष द्यायचे, त्यामुळे आपल्या आईच्या कृपेने प्राप्त झालेल्या प्रकाशित आत्म्यामुळे संपूर्ण विराटाला प्रकाशित करायचे आहे. खऱ्या अर्थाने प्रकाशित करून काही झाले तरी सर्व भौतिक प्रकाशित करायला हवे, कारण आपण शुद्ध आत्मा आहोत.

श्री माताजी २१-५-८४

आपल्याला इतके हवे असते पण आपल्या गरजा इतक्या थोड्या असतात.....

प्रकाशित व्यक्तिला काहीच आवश्यक नसते.

श्री. बुद्ध

